रजा घेऊन गेलों होतों. त्यावेळीं आमची मोठी मुलगी चि. बगुबाई ही मुंबईस सासरी असून आजारी होती. आजार म्हणजे कफ, दमा वगैरे होता. आजारीपणा जास्त वाढूं लागला म्हणून तिच्या नवऱ्यानें तिला आमच्याकडे आणून पोंचविली. मी रीतीप्रमाणे औषधोपचार सुरू केला; परंतु गुण नाहीं. सर्व उपाय झाले. घरांत श्रीसमर्थ साईबाबांची तसबीर देवांपाशीं नित्य पूजेस म्हणून ठेवलेली होती. दसऱ्याचा दिवस असल्यामुळें मी जरी आजारी होतों व स्नान वगैरे करीत नसें तरी कुटुंबास नैवेद्याकरितां श्रीखंड करण्याबद्दल सुचविलें व त्याप्रमाणें सर्वांनुमतें तें तयारही झालें. दोन प्रहरीं भोजनाच्या वेळीं मी व आमच्या वर सांगितलेल्या आजारी मुलीनें देवाचा प्रसाद म्हणूनच थोडें श्रीखंड भक्षण केलें. झालें! तोच श्रीखंडाचा प्रसाद आमच्या मुलीस सोसला नाहीं असें म्हणण्यापेक्षा तिच्या शरीरांतील रोगाचें मूळ काढण्यास कारण झाला. त्याच रात्रीं सुमारें ९ वाजण्याच्या सुमारास मुलीस दमा जास्त झाला व जणूं शेवटची वेळ आली असें वाटून आमची मातुःश्री मला मी बाहेर झोंपलों होतों त्या ठिकाणीं हाक मारण्यास आली व म्हणाली कीं, मुलीचा प्राण जाण्याची वेळ आली आहे, तरी एक वेळ पाहावें. हें ऐकून माझा तापाचा आजार नाहींसा झाला व घरांत जाऊन पाहतों तों मुलीनें डोळे फिरविले आहेत व १।२ मनुष्यांनीं तिला एका लोडापाशीं टेकून धरली आहे. हा सर्व प्रकार पाहून मी तर घाबरलों; परंतु वाचकहो, यावेळीं श्रीसमर्थ समाधिस्थ साईबाबा यांनीं मला जशी प्रेरणा दिली त्याप्रमाणे मीं माझ्या कुटुंबास करण्यास सांगितलें. तें असें कीं, 'देवापाशीं तुपाची वात लावा व उदबत्ती-धुप करा व मीं बाहेरून हात पाय धुवून येईपर्यंत घरांत जी चूल पेटलेली आहे त्यांतील विभूति श्री साईबाबांच्या धुनींतील उदी आहे असें समजून देवापाशीं आणून ठेवा.' त्याप्रमाणे विलंब न लागतां सर्व झालें व मीही हातपाय धुवून घरांत आलों व देवापाशीं उभा राहून करुण स्वरानें श्री बाबांस हाक मारली व या प्रसंगीं या ठिकाणी आपणच माझे देव, गुरु, वैद्य वगैरे सर्व आहांत असें सांगून मुलगी या वेळेपासून आपल्या पदरांत दिली आहे असें सांगितलें. कारण, मरते वेळीं तरी तिला प्रभूचें स्मरण राहील. इतकी प्रार्थना करून देवांपाशीं कुटुंबानें चुलीतील आणलेली राख श्री साईबाबांच्या धुनींतील प्रत्यक्ष उदी म्हणून मुलीचे कपाळास लाविली. उदीचा स्पर्श होण्याची खोटी तोंच ज्या मुलीची वाचा बंद झाली होती तिनें प्रथम मला हाक मारली व म्हणूं लागली कीं, अहो, एक साधु आपल्या देवापाशीं उभे आहेत व मला सांगत आहेत कीं, 'तुझ्या बापानें हाक मारल्यावरून आलों आहें; आतां मी तुला मरूं देणार नाहीं.' मला किंवा त्याठिकाणी असलेल्या मनुष्यास हे काही दिसले नाही. मी मात्र मनांत समजलों व मुलीस साधूचें वर्णन कर म्हणून सांगितलें. त्या वेळीं तिनें जें वर्णन केलें तें असें :– एक उंच बांधा असलेले साधु. मस्तकास फडके गुंडाळलेलें आहे, काखेंत झोळी असून हातांत एक छडी आहे व मला सांगत आहेत कीं, 'मी तुला आतां माझ्या झोळींत घेतली आहे, तरी भिण्याचे कारण नाहीं.' हें सांगण्याचें कारण असें कीं, मुलीला पिशाच्चबाधा झालेली होती व तें पिशाच्च या वेळीं मुलीला सोडून बाहेर जाऊन तेथून भीति दाखवीत होतें.

सांगण्याचें कारण असें कीं, मुलगी त्या ठिकाणीं आलेल्या श्रीसमर्थ साईबाबा यांस सांगूं लागली कीं, 'बाबा, त्या पिशाच्चानें माझी मान दाबली, त्यामुळें मी बेशुद्ध झालें; आपण आल्याबरोबर तें पळून बाहेर गेलें आहे.' त्या वेळीं मी मुलीस सांगितलें कीं, हे साधु इतर कोणी नसून शिरडी येथील श्री साईबाबा आहेत. तरी त्यांच्या पायांवर मस्तक ठेव. त्याबरोबर अंथरुणावरूनच तिनें मस्तक श्री बाबांच्या पायांवर ठेविलें व आम्हांस सांगूं लागली कीं, 'ते साधु साईबाबा उभे आहेत. तरी त्यांस आसन द्यावें.' ताबडतोब देवांपाशीं आसन घातलें व कांहीं ग्रहण करण्याबद्दल मुलीलाच विनंति करण्यास सांगितलें. कारण आम्हां कोणासच साधु श्री साईबाबा अगर तें पिशाच्च दिसत नव्हतें. श्री साईबाबांनीं घरांत कांहीं फळें आहेत त्यापैकीं एक द्यावें असें सांगितलें व त्याप्रमाणें तें त्या ठिकाणीं आणून ठेविलेंही. नंतर आम्हीं प्रसाद म्हणून तें खावें असें मुलीनें सांगितल्यावरून सर्वांस प्रसाद दिला. नंतर श्री साईबाबा मुलीस म्हणाले कीं, 'मी आतां जातों; वेळ झाली. पिशाच्चास आतां भिण्याचें कारण नाही.' झाले! क्षणार्धांत ते दिसेनासे झाले व मुलगीही ताबडतोब बसल्या जागींच खालीं पडली व झोंपेच्या पूर्ण स्वाधीन झाली. मला या वेळीं प्रेमाश्रू आले व जो आनंद झाला तो लिहिणें शक्य नाहीं. माझ्याशिवाय श्री साईबाबांना माझ्या घरांतील कोणीही मनुष्यानें प्रत्यक्ष पाहिलें नव्हतें असें असतां मुलीलाच फक्त प्रत्यक्ष दर्शन व तेंही समाधिस्त झाल्यानंतर ३ वर्षांनीं! त्या वेळीं तेथे असलेल्या मंडळींस मोठे नवल वाटलें यांत विशेष नाहीं.

–न. दि. फाटक

---

(श्री साईलीला, मार्गशीर्ष, पौष, माघ, शके १८५४)

माझ्या धाकट्या भावाला — चि. लक्ष्मीकांत याला वरचेवर डोकें दुखून ताप येत असे. औषधोपचार केले तरी ताप कांहीं सुटत नव्हता. एके दिवशी त्याला असाच ताप आला असतां आमची आई सौ. वत्सलाबाई वाक्कर यांच्या येथें गेली होती. तिनें मुलाच्या आजाराची गोष्ट काढतांच त्यांनी श्री साईमाऊलीच्या उदीविषयीं स्वतःचे अनुभव सांगितले व थोडी उदी देऊन ती मुलास पोटांत घेण्यास द्या असेंही सांगितलें. आईनें घरीं येतांच

बाबांचे स्मरण करून मोठ्या प्रेमभावानें ती त्याला दिली. लवकरच मुलाचा ताप उतरला. त्याची डोकें दुखून ताप येण्याची खोड त्या वेळेपासून नष्ट झाली.

त्या वेळेपासून आमची श्री साईबाबांवर भक्ति बसली व आम्ही त्यांची उदी घरांत बाळगूं लागलों. उदीचा दुसरा अनुभव आम्हांस आमच्या दुसऱ्या धाकट्या भावाच्या—चि. कृष्णकुमारच्या आजारांत आला.

एका गुरुवारीं पहांटेस त्याला एकाएकीं ताप भरला. सारा दिवस तो तसाच राहिला, परंतु संध्याकाळच्या सुमाराला टॅंपरेचर चढत जाऊन १०५ ताप झाला. आई सौ. वत्सलाबाई वाकर यांच्या येथें दर गुरुवारीं श्री साईबाबांची आरती होत असतें तेथें गेली होती. ती घरीं येऊन पाहते तों मुलाचा ताप अनावर झालेला. घरांत डॉक्टर वगैरे आणण्यास कोणीच मनुष्य नाहीं. जो तो आपल्या कामावर गेलेला. अगदीं नाइलाज झाला. शेवटीं आईनें आमच्या लहान बहिणीला शेजारच्या प्रार्थना समाजांतील होमियोपाथिक डॉक्टराला बोलावून आणण्यास सांगितलें. तो आल्यावर त्यालाही मुलाची अशी स्थिति पाहून कांहीं सुचेना. आतां तर मुलगा तळमळूं लागला—तोंडानें वडबडूं लागला. त्याची कांहीं धडगत दिसेना. डॉक्टरनें औषध दिलें व भजनाची वेळ झाल्यामुळें तो निघून गेला. इतक्यांत आमच्या आईस श्री साईबाबांच्या उदीची स्मृति होऊन तिनें हातपाय धुवून ती त्याच्या कपाळाला लावली व पोटांत घेण्यास दिली. मुलाला त्या वेळेपासून आराम पडूं लागला. रात्रीं मुलाचा ताप साफ नष्ट होऊन दुसऱ्या दिवशीं तो हिंडूं फिरूं लागला. काय हा अद्भुत चमत्कार! धन्य श्री साईनाथ! आणि धन्य त्यांची भक्तांवरील कृपादृष्टि!!

उदीचे आणखी कित्येक अनुभव लेखकाला आले आहेत; परंतु ते सर्व एकाच ठिकाणी नमूद करूं गेल्यास कित्येक पानें लागतील. म्हणून एवढेंच सांगून मी माझी लेखणी खाली ठेवतों.

—चंद्रकांत बा. मालवणकर
कराची.

---

(श्री साईलीला, अंक ४-५, वर्ष ६ वें)

पूर्वी घरांतल्या मंडळीजवळ नेहमीं उद्गार काढत असे कीं, जर मला श्री बाबांच्या कृपेनें नोकरी लाभली तर मी पहिल्या पगारांतून श्री बाबांची दक्षिणा व शिर्डीस जाण्याचा खर्च करीन. पुढे १९१७ सालांत मला ३५ रुपयांवर नोकरी मिळाली व पहिल्या पगारांतून प्रथम श्री बाबांस देण्यास दक्षिणा रुपये २० व रुपये १५ श्री शिर्डीस जाण्यास असें ठरविलें. पुढें श्री शिर्डीस जाण्यास कोणाबरोबर जावें हा प्रश्न उभा राहिला व त्या वेळेस अंधेरीचे कै. बेंद्रेमास्तर आमच्या गावांतल्या शाळेंत हेडमास्तर होते. त्यांनी मला श्री शिर्डीस जावयाचें आहे. जर आपणांस यावयाचें असल्यास माझी चांगली सोबत होईल व मी त्यांच्याबरोबर दादरवरून ४ च्या प्यासेंजर गाडीनें जाण्याचें ठरविलें. तो विचार मी आमच्या घरांत कळवून श्री शिर्डीस जाण्यास दुपारी निघालों. माझा जाण्याचा विचार झाला असें पाहून माझ्या मोठ्या वहिणीस फार वाईट वाटले. ती म्हणूं लागली कीं, आपण श्री बाबांची सारखी भक्ति करीत असतांना श्री बाबांनी तुलाच शिर्डीस जाण्याचा योग आणला व मला आणूं नये ही एक आश्चर्याची गोष्ट आहे व आपण श्री बाबांच्या फोटोजवळ अश्रू ढाळीत वसली. तें पाहून मला फारच वाईट वाटलें व मी तिला म्हणालों, ‘मी एकदां श्री बाबांचे दर्शन घेवून आलो म्हणजे सवडीप्रमाणे घरातील प्रत्येकास शिरडीस नेवून बाबांचे दर्शन करवीन.’ तरी पण तिची समजूत होत नाहीं तेव्हां माझ्या आईनें उसने पैसे घेऊन तिला माझ्याबरोबर जाण्यास सांगितलें व आम्हीं दोघें व कै. बेंद्रे मास्तर, त्यांचें कुटुंब व आमच्या शेजारच्या गांवची एक वृद्ध लोहारीणबाई असे शिर्डीस निघालों व दुसरे दिवशी सकाळीं दहा वाजतां श्री शिर्डीस पोंचलो. त्या वेळेस श्री बाबा श्री लेंडीवर जाण्यास निघाले होतें. तेव्हां आम्हीं ताबडतोब आमचें सर्व सामानसुमान कै. दीक्षितांच्या वाड्यांत ठेवून दर्शनाचा लाभ घेतला. नंतर स्नान आटोपून श्री बाबा मशिदींत बसले होते त्यांच्या दर्शनास गेलों. मशिदींत भक्तमंडळींची बरीच गर्दी असल्यामुळें कै. बेंद्रे व मला बसण्यास जागा नव्हती म्हणून आम्हीं श्री बाबांच्या समोर उभे राहिलों. तेव्हां कै. बुटीसाहेबांनीं श्री बाबांच्या जवळ तंबाखूची चिलमी भरून ती त्यांच्या हातांत दिली व त्यांनीं तिचा एक झुरका मारून ती माझ्याकडे नजर लावून मला देऊं लागले. माझी ही प्रथम शिर्डीची खेप असल्यामुळें मला ती त्यांच्या हातांतून घेणें प्रशस्त वाटलें नाहीं व मी त्यांना सांगितलें, ‘बाबा, मी लहान असल्याकारणानें तंबाखू ओढत नाहीं.’ तेव्हां त्यांनीं आपला हात मागें घेऊन इतर भक्तमंडळींस आळीपाळीनें दिली. अंमळशानें श्री बाबांनीं मजकडे दृष्टि लावून १० रुपये दक्षिणा मागितली व ती मी वाड्यांत जाऊन श्रींस आणून दिली. नंतर त्यांनीं कै. बेंद्रेंकडून घेतली व नंतर माझी बहीण बायकांत बसली होती तिजकडून मागितली व पुन: मजकडून मागितली व मी त्यांची ठराविक रक्कम त्यांस आणून दिली. पुढें आम्हीं वाड्यांत गेल्यानंतर आमचा परत घरीं जाण्याचा हिशेब तपासून पाहातों तो आम्हांस थोड्या पैशांची तूट पडत होती व आम्हीं श्रीशिर्डीत नवीन असल्याकारणानें भक्तमंडळीची चांगलीशी ओळख झाली नव्हती. तेव्हां आम्हांस मोठा विचार पडला. नंतर आम्हीं कै. बेंद्रे मास्तरांस थोडे पैसे देण्याचें विचारिलें. तेव्हां ते म्हणाले, ‘मी माझ्याबरोबर जास्त पैसे आणले नाहींत; उलट मी श्री बाबांच्या दक्षिणेच्या पैशांतून श्रीशिर्डीस आलों. नंतर आमच्याबरोबर जी वृद्ध लोहारीण बाई आली होती ती म्हणूं लागली कीं, अहो आपण श्री बाबांच्या चरणांजवळ आलों

असतां अशी कां काळजी करतां. तेव्हां आम्हीं सर्व हकीकत तिला निवेदन केली व ती म्हणूं लागली, अहो, श्री बाबांची तुमच्यावर पूर्ण कृपा आहे म्हणून श्री बाबांनीं तुमच्याकडून दक्षिणा मागितली. माझ्यावर कृपा नाहीं म्हणून माझ्याजवळून एक पै सुद्धां दक्षिणा घेतली नाहीं. त्यांनीं तुम्हांस येथवर आणलें आहे तेच तुम्हांस घरीं सुखरूप नेतील त्यावद्दल आपण काळजी करूं नये. तुम्हांस पैशाची अडचण पडल्यास तुम्ही मजकडून घ्या व घरीं गेल्यानंतर आपल्या सवडीप्रमाणें माझे पैसे परत करा. हे त्या बाईच्या तोंडून उद्गार निघतांच आम्हांला मोठा आनंद झाला व श्री बाबांच्या लीलेचे कौतुक वाटलें.

रात्रीं जेवणखाण आटोपल्यावर श्री बाबांची मशिदींतून चावडीवर निघण्याची तयारी चालली होती व भक्तमंडळी आपआपल्या मित्रमंडळीस बाबांच्या सेवेकरितां चवऱ्या, चामरें व पंखे वगैरे देत होती. तेव्हां माझ्या मनांतून श्री बाबांच्यावर चवरी, चामरें किंवा पंखे यांतून कांहीं तरी एक वस्तु ढाळण्याचें होतें; पण मला ती कोणाजवळून मागून घेण्याचा धीर होईना व आपण ह्या बाबांच्या सेवेला मुकणार; कारण माझी ती प्रथम वेळ असल्याकारणानें माझी कोणाबरोबर चांगलीशी ओळख नव्हती. माझ्या मनांत अनेक विचारांनीं खळबळ उडाली. इतक्यांत श्री बाबांनीं माझ्या मनांतला हेतु जाणून एक भक्त आपोआप माझ्याजवळ एक चवरी देऊन आपण श्री बाबांवर चवरी ढाळतां काय? असें विचारून चालता झाला. तें पाहून मला आनंद वाटला व श्री बाबा सर्वज्ञ आहेत व आपल्या लेकरांचीं वेळोवेळीं कोडकौतुकें कशीं पुरवितात याचा पूर्ण अनुभव आला.

मी दरसाल श्रीशिर्डीस उत्सवाला कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर व रा. रा. रघुवीर भास्कर पुरंदरे यांच्याबरोबर जात येत असतों व श्रीशिर्डीस सुखरूप पोंचल्याचें व निघण्याचें पोष्ट कार्ड घरी पाठवीत असतों. १९२३ सालांत पावसाळ्याचे दिवसांत माझें कुटुंब बाळंतीण असतांना मी उत्सवास गेलों व तेथून मी अमुक दिवशीं अमुक वेळेस येण्याचें कार्ड घरीं पाठविलें असतांना कांहीं कारणामुळें कै. अण्णासाहेब दाभोळकर व पुरंदरे यांचा निघण्याचा बेत आम्हीं ज्या दिवशीं निघणार त्याच्या थोड्या वेळानें झाल्यामुळें मला पत्रांत लिहिलेल्या वेळेप्रमाणें घरीं येतां आलें नाहीं व घरची मंडळीं काळजी करूं लागली व मनांत नाना तऱ्हेचे विकल्प आणूं लागली कीं, हल्ली पावसांत श्रीगोदावरीस जास्त पाणी झालें असेल कीं काय अशी काळजी करूं लागली व माझें कुटुंब दुपारीं जेवण झाल्यानंतर विचार करीत असतां तिला झोंप लागली व तिनें खालीं लिहिल्याप्रमाणें स्वप्न पाहिलें:

आमच्या गांवापैकीं एक वृद्ध ब्राह्मण आपल्याबरोबर एक १४-१५ वर्षांचा तेजस्वी मुलगा घेऊन आमच्या दारांत उभा राहून माझ्या आईस हांक मारून म्हणाला कीं, आपण आपल्या मुलाची काळजी करण्याचें कांहीं कारण नाहीं. तो आमच्या येथें कांहीं परक्या ठिकाणीं नव्हता. तो चांगला सुखरूप होता. असें म्हणून त्या मुलास पुढें करून आईस म्हणाला, हा घ्या तुमचा मुलगा, असें म्हणून आपण अदृश्य झाला.

इतक्यांत माझें कुटुंब जागें होऊन पाहूं लागलें तों स्वप्नांतील ब्राह्मण व तो मुलगा देखील नाहीं व त्याच दिवशीं संध्याकाळीं मी श्रीशिर्डीहून घरीं आलों.

श्री बाबा समाधिस्थ होण्याच्या आदलें दिवशीं माझ्या मोठ्या वहिणीनें पाहिलेलें स्वप्न:

मीं श्रीशिर्डीस गेलों व परत आलों तेव्हां फक्त श्री बाबांचा प्रसाद आणला व तीर्थ आणलें नाहीं. तेव्हां बहीण माझ्यावर रागावली.

दुसऱ्या दिवशीं श्री बाबा समाधिस्थ झाले ही आम्हांस बातमी लागली.

माझे वडील आपल्या मिळकतींतून दरमहिन्यास दररुपयास पाव आणाप्रमाणें धर्मफंड म्हणून कांहीं रक्कम काढतात. त्याप्रमाणें मी नोकरीस लागल्यावर माझ्या मिळकतींतून कांहीं तरी रक्कम श्री बाबांच्या नावानें निराळी काढून ठेवीत असे. पुढें ती रक्कम श्रीशिर्डीस बाबांस कशी पोंचेल ही मला रात्रंदिवस काळजी होती व मी श्री बाबांजवळ आपल्या नांवानें काढलेली रक्कम आपण कोणत्या ना कोणत्या रूपें आमच्याकडून आपणांस मिळेल असा मार्ग दाखवावा अशी प्रार्थना करीत असे. त्या वेळीं कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर व कै. हरी सिताराम दीक्षित यांची माझ्याबरोबर चांगली ओळख नव्हती. ते फक्त बस्वेवर श्रीशिर्डीस जात येत असत एवढें माहीत होतें. अशा विचारांत बरेच दिवस लोटल्यावर मी एके दिवशीं रात्रीं मेलचें काम आटोपून चर्चगेट स्टेशनवर ८-२० च्या गाडीनें ऑफिसमधून घरीं परत येत असतांना कै. दाभोळकर त्याच गाडीनें पार्ले येथे कै. दीक्षितांकडे कांहीं कारणास्तव जातांना माझे डब्यांत येऊन माझ्या शेजारीं बसले; तरी पण त्यांची माझी ओळख नसतांना मी त्यांस गाडींत नमस्कार केला व त्यांची ओळख करून घेतली व त्यांना श्री बाबांच्या नावानें काढलेली रक्कम श्रीशिर्डीस बाबांकडे कशी रवाना होईल व दुसरी बरीच माहिति पार्ले स्टेशन येईपर्यंत विचारून घेतली व त्यांनीं मला योग्य सल्ला देऊन श्रीशिर्डी संस्थानची सर्व बातमी दिली व श्री साईलीलेच्या सभासदांच्या वर्गणीदारांबद्दल वगैरे सांगितलें. अशा रीतीनें मी श्रींचे कृपेनें सामान्य वर्गणीदार होऊन तेव्हांपासून प्रत्येक उत्सवास त्यांच्या व रा. रा. पुरंदरे यांच्याबरोबर श्रीशिर्डीस जात येत होतों. आतां ऑफिसच्या कडक कायद्यामुळें मी दर रामनवमीच्या उत्सवास जातों व अशा प्रकारें श्री बाबांनीं माझ्या सर्व अडचणी दूर केल्या व पुढेही करतील अशी मी रात्रंदिवस त्यांच्याजवळ प्रार्थना करितों.

–आ. प. डोळस
कांदिवली.

---

(श्री साईलीला, चैत्र, शके १८४९)

सन १९२१ सालीं माझी बदली ऐन वरसातींत मनासे महालीं झाली. त्या वेळीं सर्व अडचणी सोसून मला नोकरीवर रुजू होणें भाग झालें. तेथें पोंचल्यावर माझी कन्या 'प्रेमा' ही मलेरियानें बिमार पडली. तिला दवाखान्यांतील औषध मी देऊं लागलों, परंतु औषध नित्य देत असतांही ती दिवसेंदिवस खंगत चालली व जी शरीरानें गुलगुलीत होती ती केवळ अस्थिचर्माचा डोलारा होऊन बसली. पुढें कांहीं दिवसांनीं तर तिचें बोलणेंही बंद होऊन ती एकसारखी इकडून तिकडे तडफडत लोळूं लागली. तिला काय होत होतें तेंही तिला सांगण्याची ताकद नव्हती. डॉक्टरसाहेबांस बिमारीचा हाल विदित करून औषधाची योग्य योजना करण्याबद्दल नम्रतेनें प्रार्थना केली, तर आमच्या शास्त्रांत तुम्हास बोलतां येत नाहीं, जें औषध दिलें जात आहे तेंच योग्य आहे, असा अधिकारयुक्त जबाब मिळे. सरते शेवटीं त्यांच्या ट्रीटमेंटचा तिरस्कार येऊन मी त्यांची रजा घेतली व वैद्याचें औषध सुरू केलें. परंतु फार दिवस डिप्लोमाधारी डॉक्टरसाहेबांच्या कुचंवर्णीत राहिल्यानें बिचाऱ्या वैद्याचे हातास यश येईना व मुलीस असह्य वेदना होऊं लागल्या. माझी पत्नी आपल्या पोटच्या गोळ्याजवळ रात्रंदिवस बसून अश्रू ढाळीत असे व मनांत श्रीसमर्थांचा दुःख निवारण करण्याकरतां धांवा करीत असे. असें होतां होतां एके दिवशीं धांवा करीत असतां तिच्या कानावर असें शब्द पडले कीं, "मुली, घाबरू नकोस. आजपासून तिसऱ्या दिवशीं हे अरिष्ट दूर होईल." हा दृष्टांत दुसरा कोणाचा नसून श्रीसमर्थ बाबांचाच आहे असें तिला वाटून तिनें मोठ्या प्रेमानें तो मला सांगितला. पण पुढें तिसरे दिवशीं असें झालें कीं, प्रेमाची सर्व हालचाल बंद पडून तिनें डोळे मिटले व नाडीही हातास लागेना. तेव्हां अर्थातच ती गतप्राण झाली असें पाहून तिची आई आक्रोश करूं लागली व मला म्हणूं लागली कीं कां हो, बाबांचे शब्द असत्य कां झाले? त्यावर मी तिची कशीतरी समजूत घालून आपल्या कर्माचीं फळें आपल्यास भोगलींच पाहिजेत, सर्व गोष्टींत श्री साईबाबांवर भार घालणें ठीक नाहीं असें म्हणालों व तिच्या मांडीवरून मुलीस माझ्या मांडीवर घेतली व लागलीच माझ्या मनांत अकस्मात प्रेरणा झाली कीं, ह्या मुलीस गंगोदकांत बाबांची उदी कालवून पाजावी. ती कल्पना मी माझ्या पत्नीसही सांगितली. तें ऐकून तिनें तात्काळ मला म्हटलें कीं, तुम्ही उदी कोणास पाजणार? जिला पाजणार ती आतां सजीव नाहीं, मातीस पाजून काय होणार? तेव्हां मी तिला समजावून सांगितलें कीं, काय असेल तें असो माझी इच्छा तर हिला गंगोदकांत उदी द्यावी अशीच होत आहे. आतां गंगोदक नळीखालीं नच गेलें तर तिच्या अंगावर तर सांडेल. तेवढें काय कमी आहे? कसेंही कर व मला गंगा व उदी आणून दे. असा माझा दुराग्रह पाहून तिनें गंगोदक व समर्थांची उदी मजजवळ ठेवली. मी लागलीच लहान चमच्यांत गंगोदक घेऊन त्यांत उदी घातली व एक बूंद करून मुलीची दांतखिळी उचटून तिच्या तोंडांत घालूं लागलों. असें करतां करतां सरासरी पाव चमचा गंगोदक तिच्या तोंडांत रिचवल्यावर तिने मिटलेले डोळे किलकिले करून ती मजकडे पाहूं लागली. हें पाहतांच मी माझें पत्नीस हांक मारून म्हणालों कीं, तूं रडूं नकोस. श्रीसमर्थांचें वचन असत्य नाहीं. तूं शांत हो व मुलीच्या डोळ्याकडे पहा. म्हणजे तुझी प्रेमा पुनः सजीव झाली आहे असें तुला दिसेल. तें ऐकून माझ्या पत्नीनें शांत चित्तानें मुलीकडे पाहिल्यावर मुलगी डोळे किलकिले करून पहात आहे अशी तिची खात्री झाली व दुःखाश्रूंच्या ऐवजीं तिच्या नेत्रांतून आनंदाश्रू वाहूं लागले. नंतर थोडा वेळ पावेतो मी त्या मुलीस एकसारखा उदी मिश्रित गंगोदक पाजितच राहिलों व सुमारें अर्ध्या तासानें ती थोडी हालचालही करूं लागली. त्या बाबांच्या उदीरूपी संजीवनीनेंच तिचे सर्व दुखणें बरें होऊन सुमारें दोन महिन्याचे आंत ती चांगली हिंडू खेळूं लागली व त्याच प्रेमाचा विवाह श्रीसमर्थांनी याच वर्षी ता. १ जून रोजीं येथें निर्विघ्न सिद्धीस नेला. खऱ्या प्रेमाच्या हांकेसरशीं संकटसमयीं दीनानाथ भक्तवत्सल श्री साईबाबा कसे धाऊन आले व कशा युक्तीनें संकट निवारण केलें तें वरील हकीकतीवरून सद्भक्तांना जाहीर होईलच. आतां सरते शेवटीं 'वेडें वांकुडें गाईन। दास तुझा म्हणवीन॥ अशी समर्थ चरणीं विनवणी करून मी रजा घेतों.'

—गणेश केशव रेगे

(श्री साईलीला, चैत्र, शके १८४९)

मुंबईत माझ्या धाकट्या भावास, तो चार पांच वर्षांचा असतां आजारांत आंकडी येत असे. एकदां असाच त्यास तीन चार दिवस पुष्कळ ताप येऊन आंकड्या येऊं लागल्या. डॉक्टराचें औषध चालूच होतें. रोज दोन तीन वेळ डॉक्टर येत असत. अमावास्येचा दिवस होता. त्या दिवशीं त्यास फार आंकड्या येऊन त्याचे हातपाय वगैरे थंड पडूं लागले. डॉक्टरानें सुद्धां जवळ जवळ आशाच सोडली होती. पुष्कळ उपाय केले तरी आंकड्या थांबत नाहींत असें पाहून शेवटीं डॉक्टरानें एक निर्वाणीचा उपाय म्हणून त्याच्या कानशिलाजवळ औषधाच्या कांडीनें डाग दिल्यासारखे केलें व जास्त वेळ बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें पाहून निघून गेले. आमच्या घरची सर्व मंडळी जवळ होती. भावाच्या डोळ्याच्या काचा बनूं लागल्या होत्या. तेव्हा आमच्या आईनें शेवटचा उपाय म्हणून श्री साईमहाराजांचें तीर्थ

त्याच्या तोंडांत घातलें. त्याबरोबर त्यानें एकदम डोळे उघडून किलकिले केले व म्हणाला, "साईबाबा मला पांग्या हांक मारतात." (आम्ही पूर्वी शिरडीस गेलों होतों; त्या वेळेस श्री साईमहाराजांनीं त्यास "पांग्या" असें पदरच्या नांवानें हांक मारून एक पैसा दिला होता.) त्या वेळीं आम्ही आश्चर्यानें थक्क झालों व बाबांना शरण गेलों असतां कशा तऱ्हेनें ते मदत करतात हें दिसून आलें.

एकदां नेहमीप्रमाणें आम्ही उपनगरांत राहण्यास गेलों होतों. तेथें राहण्यास गेलों तरी एक दोन दिवसांनीं कोणी तरी आमच्या घरचें मुंबईत कांहीं कामासाठीं येत असे. एके दिवशीं असाच आमच्या घरचा इसम मुंबईत आला होता. मुंबईतील सर्व काम आटपून परत जातांना त्याच्या हातून दरवाजास कुलूप घालण्याचें राहून गेलें व त्यामुळे दार उघडें राहिलें. दुसऱ्या दिवशीं पुन: आमचे वडील मुंबईत कांहीं कामासाठीं आले असतां घरीं गेले आणि पहातात तों दार उघडें. त्यांस वाटलें कीं आंत खास कोणीतरी चोर असला पाहिजे व त्यानेंच दार फोडून आंत शिरकाव केला असला पाहिजे. म्हणून वडिलांनीं आंत शिरतांच सामान वगैरे नीट पाहिलें तों त्यांस कांहींच तसें दिसून आलें नाहीं. चौकशी अंतीं असें आढळून आलें कीं आदल्या दिवशीं जो इसम आला होता त्याच्या हातून कुलूप लावण्याचें राहून गेलें होतें व त्यामुळें दरवाजा उघडा राहिला. असो. मुंबईसारख्या शहरांत दिवसाढवळ्या घरांत मंडळी असतां चोर बिनधोकपणें आंत शिरून चोरी करतात, तेथें एखाद्यास आमच्या घरासारखें जर एखादें घर सबंध दिवस व रात्र उघडें मिळालें असतें तर त्यानें तें घर सावकाशपणें सर्व लुटून नेलें असतें; पण असें व्हावयाचें नव्हतें. कारण 'देव तारी त्यास कोण मारी' ह्याप्रमाणें आमच्या जिन्यावर श्रीमहाराजांची एक मोठी तसवीर टांगलेली आहे. अशी कीं ती खालून रस्त्यावरून सुद्धां दिसते. असो. तेव्हां त्या रात्रींसुद्धां महाराजांनींच घर राखिलें व आम्हांवर असलेल्या त्यांच्या ऋणांत भर टाकली.

मुंबईत आम्ही दुसऱ्या घरांत राहावयास गेलों होतों. आमच्या शेजारील गाळ्यांत दुसरे भाडोत्री नसल्यामुळें आम्ही वरच्या शेवटच्या मजल्यावर एकटेच असूं. एकदां आम्हीं सर्वजण आमच्या नातेवाईकाच्या लग्नसमारंभास दारास कुलुप लावून गेलों होतों. संध्याकाळची वेळ होती. आमच्या पश्चात् एक चोर कुलुप फोडण्याचा प्रयत्न करीत होता. त्यानें कुलुपावर चीनीचें इतके वार केले होते कीं एखाद्या त्यांच जातीच्या कुलुपाचे सुद्धां सहज फुटून भाग पडले असते. पण महाराजांच्या कृपेनेंच त्यास त्याच्या प्रयत्नांत यश आलें नाहीं. चोरानेंही खालील मजल्यावर कोणाची चाहूल ऐकून आपलें काम आटोपतें घेतलें. अशा रीतीनें ह्या खेपेसही महाराजांनी आमच्या घराचें राखण केलें. ह्यानंतर आम्ही घर बंद करून जात होतों पण ह्यापुढें महाराजांच्या कृपेनें तसें कांहीं घडलें नाहीं.

माझ्या मोठ्या बंधूस दुखणें लागलें होतें, त्याकरितां आम्हीं हवा पालटण्यासाठीं खडकीस गेलों होतों. औषध पाणी वगैरे सर्व पथ्य चालू होतें. आम्ही तेथें असतांना आमच्या वडिलांस ताप आला व त्या तापाच्या संसर्गानें माझ्या भावासही त्या दुखण्यांत तापानें पछाडिलें. आधींच तो फार अशक्त झाला होता व त्यांत हा भयंकर जोराचा ताप. डॉक्टर दिवसा रात्रीं बारा वाजेपर्यंत पांच सहा फेऱ्या घालीत असत. त्या दिवशीं संध्याकाळीं जातांना त्यांस प्रकृतीविषयीं विचारलें तेव्हां असें सांगितलें कीं, "माझ्या पश्चात् काय होईल ह्याविषयीं सांगवत नाहीं, आतां त्यांस टोचून औषध घातलें आहे, पण हृदयाच्या अशक्तपणामुळें तें केव्हां बंद पडेल ह्याचा भरंवसा नाहीं." आम्हीं सर्व घाबरून गेलों. वडिलांस तर अंगांत जोराचा ताप. एका घरांत अशा रीतीनें दोन इसम आजारानें पछाडिले होते. ह्या वेळेस काय करावें हें सुचेनासें झालें. भावाच्या अंगांत ताप होता तरी त्याची शुद्ध गेली नव्हती. जेव्हां त्यास समजलें कीं आपलें दुखणें भारी आहे तेव्हां त्यानें श्रींस बिछान्यावरच हाताच्या खुणेनें नमस्कारासारखें करून प्रार्थना केली कीं, "बाबा, मला दुखण्यांतून पार पाडाच." आम्हीं सुद्धां श्रीमहाराजांच्या फोटो जवळील नंदादीपांत तूप घालून श्रींची मनोभावानें प्रार्थना केली व चमत्कार असा कीं दुसऱ्या दिवसापासून वडिलांच्या व भावाच्या आजाराचा जोर कमी होऊन कांहीं दिवसानंतर वडील बरे झाले व भाऊ पूर्ववत् हिंडूं फिरूं लागला. अशा रीतीनें श्री साईंवर निष्ठेनें भार टाकिला असतां ते कशा रीतीनें आपली काळजी घेतात ह्याचें प्रत्यंतर आम्हांस पहावयास सांपडलें.

– शान्तातनय

### बाबांचे आमचे घरीं आगमन

पूर्वी आम्हांला महाराजांबद्दल मुळींच कांहीं माहिती नव्हती. फार तर काय, त्यांचें नांवही आमच्या कानीं आलें नव्हतें. पण आठ दहा वर्षांपूर्वी एकदां आमच्या मातोश्रींनीं महाराजांचा फोटो मात्र एकाचे घरीं पाहिला व त्यांचेकडून थोडीशी माहितीही पण कळली. त्यावरून आपलेही घरीं बाबांचा फोटो असावा अशी इच्छा उत्पन्न झाली. म्हणून मातोश्रीनें त्यांचेकडे फोटो असल्यास एक मागितला. परंतु त्यांचेजवळ नसल्यामुळें निराशा झाली. महाराजांची आमचे गरीबाचे येथें राहण्याची इच्छा नसल्यामुळेंच आम्हाला फोटो मिळाला नाहीं अशी स्वतःच्या मनाची समजूत करून मातोश्री घरीं निघून आली. तिला धार्मिक पुस्तकें वाचण्याचा नाद असल्यामुळें ती नेहमीं प्रमाणें "सूक्तिरत्नावली" हातीं घेऊन बसली. मनुष्याचा हा साधारण

नियम आहे कीं एखादें पुस्तक हातीं लागलें कीं प्रथम तें चाळून पाहावयाचें. त्याप्रमाणें तिनें तें पुस्तक एक दोन वेळां चाळून पाहिलें व मग वाचण्यास सुरुवात केली. एके दिवशीं सहज वाचतां वाचतां तिला बाबांची एक मधून दोन तुकडे झालेली छबी (छोटीशी) त्यांत सांपडली ती छबी दृष्टीस पडतांच नमन करून लागलीच एका जाड कागदावर नीट बरोबर ठेऊन चिकटवून घेतली व तिला मढवून देवाच्या देव्हाऱ्यांत बसविली. त्या छबीची आज पावेतों पूजा होत आहे व पुढेंही होत राहाणार. आम्हां सर्वांना बाबांच्या या अकल्पित आगमनानें अत्यंत आनंद होत आहे. बाबा असे गुप्तपणाने त्या पुस्तकांत कितीतरी दिवस राहिले असतील. बाबांची आमचेवर खरोखर किती विलक्षण कृपा आहे हें आज त्यांच्या गुप्त आगमनानें स्पष्ट सिद्ध करून दाखविलें. आमचेवर सदोदित त्या करुणामय साई माउलीची अशी कृपा असावी अशी आम्हां सर्वांची हात जोडून महाराजांस विनंति आहे. त्यांना आम्हां सर्वांचा काय पण सर्व विश्वाचा शतशः नमस्कार असो.

### मला उदीबद्दल आलेला अनुभव

मी नेहमींप्रमाणें सुट्टींत छिदगांवला गेलों. त्या वेळीं मजजवळ बाबांचा फोटो व शिरडी येथील उदीची डबी होती. एके दिवशीं तेथील सोलकण नामक शेतकरीण माझे मातोश्रीजवळ येऊन म्हणाली कीं, बाईसाहेब, माझे घरी माझ्या पतीला दोन दोन, तीन तीन मिनिटांनीं जोराच्या उचक्या येऊन अत्यंत त्रास होत आहे, बेचैन आहे, तर आपण मला कांहीं औषध द्यावें. मातोश्रींनीं औषध माहित नसल्यामुळें माझे जवळ नाहीं म्हणून उत्तर दिलें. ती खिन्न मुद्रा करून उदास व निराश होऊन घरीं जाण्यास उठली. खरोखर तिची अवस्था पाहून बाबांना वाईट वाटलें व मला उदी देण्यास प्रेरणा केली. माझे मनांत उदी देऊन पाहावें असा विचार येतांच तिला थांबण्यास सांगून मी उदी देण्यास आंत गेलों. महाराजांच्या फोटोजवळील डबींतून उदी घेऊन एक पुडी बांधली व बाबांस लवकर गुण येण्याबद्दल प्रार्थना करून ती पुडी तिच्या हातावर ठेवली व पाण्यांत कालवून पाजण्यास सांगितलें. ती घरीं जाऊन पाहते तों पूर्वीप्रमाणेंच उचक्या येऊन त्रास होत होता. उदी पाण्यांत कालवून त्याला पाजली. बाबांची लीला अगाध आहे. उदी पोटांत जाण्याबरोबर उचक्या एकदम थांबल्या. बाबांच्या उदीच्या अंगी येवढें अद्भुत सामर्थ्य पाहून आम्हां सर्वांना व त्या उभयतांना अत्यंत आश्चर्य वाटलें. उदीच्या अंगीं येवढें मोठें सामर्थ्य तर प्रत्यक्ष बाबांच्या अंगीं काय असेल याची आम्हां पामरांना मुळींच कल्पना देखील नाहीं.

भक्तांना कल्पवृक्षासारख्या साईनाथा, खरोखर तूं या भूतलावर अवतार घेऊन, गरीब लोकांना आपलेकडे वळवून त्यांना या भवरूप सागरांतून परतीराला पोंचविशील यांत मुळींच शंका नाहीं. पण भक्ति व विश्वास त्यांच्या ठायीं असला पाहिजे. अशा करुणामय दीनवत्सला साईनाथा, आम्हांला संकटांतून मुक्त करून आमचे ठायीं भक्ति लावून आम्हांला सुमार्गाला लाव, अशी कर जोडून गुरुराजा तुला प्रार्थना आहे. आमचेवर मेहरनजर असूं दे, येवढीच दिनवाणीनें प्रार्थना करून सर्वजण शिरसाष्टांग नमस्कार करून ह्या आनंदी अनुभवास पूर्ण करितों व आपली रजा घेतों. असो.

–एकदास

---

(श्री साईलीला, अंक ५-६-७, वर्ष ७ वें)

डिसेंबर १९२२ मध्यें मी रजेवर कोकणांत गांवीं असतांना श्री माडयेबुवा यांची भेट त्यांनींच स्थापन केलेल्या "श्री साई दरबारांत" कुडाळ (संस्थान सावंतवाडी) येथें झाली. तेथें श्री बाबांची मोठी व वैराग्यसंपन्न प्रतिमा ठेवण्यांत आलेली आहे. अर्थात् अशा तेजस्वी विभूतिकडे पाहून कोणास स्वर्गीय आनंद होणार नाहीं ? माझा आनंद द्विगुणित झाला आणि तेथेंच मिळालेल्या "साईलीला" अंक वाचनानें भक्तिप्रेमास भरतें आलें.

गुरुश्रेष्ठ बाबांची सोज्वळ तसबीर आपणांजवळ सदैव असावी असें वारंवार वाटूं लागलें, "साधूश्रेष्ठाच्या प्रतिमाप्रभेपासूनही मन भक्तिमय बनते." त्यानंतर जानेवारी १९२४ सालीं मला नाशिक पोलिस ट्रेनिंग स्कूलमध्यें जाणें भाग पडलें. पंधरा दिवसांनी मी श्री बाबांची तसबीर रा. रा. देव (हल्लीं पोलिस सब-इन्स्पेक्टर, मुंबई) जे माझ्याबरोबरच तेथें होते, त्यांच्या घरी पाहिली. आणि माझ्या विनंतीवरून त्यांच्या जवळ असलेली एक कॉपी मला मिळाली व तेथेंच असतांना कांहीं दिवसांनीं पोटांत एका प्रकारची इजा उत्पन्न झाल्यामुळें डॉक्टरच्या सांगण्यावरून ऑपरेशन करण्यासाठीं मुंबईत रजा घेऊन येण्यास निघालों. अशा तऱ्हेनें रात्रौ स्टेशनवर येतों तोंच एक गुजराथी गृहस्थ भेटले. सहज बोलणें होतां होतां, त्यांनीं परत मुंबईस जाण्याचें कारण विचारलें, म्हणून मी त्यांना माझी सविस्तर हकीकत निवेदन केली. त्यावरून ते म्हणाले कीं "निदान आणखी वीस दिवस आपण ऑपरेशन न करणें हें बरें. कारण ग्रह फारच वाईट आहेत." ह्या गृहस्थाचें नांव नारायणराव असून ते एका खाणावळीचे मालक होते. योगायोग असा कीं, पुढें त्यांचें नांव श्री साईलीलेंत माझ्या पाहाण्यांत आलें आणि ते मला स्टेशनवर भेटल्याची चटकन् स्मृति झाली. हे श्री बाबांचे भक्त आहेत. त्यांनीं सांगितल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं मी मुंबईत आल्याबरोबर मुद्दाम चौकशी केली. तों काय खरेंच वीस पंचवीस दिवस ग्रह अतिशय वाईट असून जिवाला फार अपायकारक असल्याचें कळलें. नंतर पंचवीस दिवसांनीं केलेल्या ऑपरेशनमधून लवकरच बरा झालों. परंतु

कांहीं दिवस स्वस्थपणें पडून राहाण्यास डॉक्टरनें सांगितलें होतें. अर्थात रजा वाढविणें भाग पडलें आणि त्या मुदतींत माझें नांव नाशिक पोलीस स्कूलमधून काढून टाकण्यांत आलें व त्यामुळें पुन्हां सब-इन्स्पेक्टरची जागा मिळणें अशक्य हेंहि ठरल्यासारखें झालें. आजारीपणांत खर्च झाला तो झालाच व शेवटीं निकालही समाधानकारक नाहीं, म्हणून रात्रंदिवस काळजी लागली; परंतु श्री बाबांचे गुणानिवाद ऐकल्यापासून मी त्यांचे रोज मन:पूर्वक स्मरण करीत असे. नंतर कांहीं दिवसांनीं बरा झाल्यावर मुंबईत डेप्युटी पोलीस कमिशनर साहेबांकडे मी हजर झालों आणि त्यावेळीं माझ्या खिशांत रा. देव यांनीं दिलेली श्रींची तसबीर होतीच. मी पूर्वी असि. सब-इन्स्पेक्टर होतोंच; परंतु त्यांनी थोडी विचारपूस करून मला पुन्हा सब इन्स्पेक्टर नेमलें. असो. हें केवळ श्री बाबांच्या कृपेचें फल होय. ही गोष्ट सप्टेंबर १९२४ मध्यें झाली.

पुढें तीन चार महिन्यांत श्री दत्तदास माडयेबुवा यांच्या बरोबर श्री. हेराम यांची भेट झाली. हे बाबांचे एकनिष्ठ भक्त आहेत. भक्ताकरवीं बाबांच्या भक्ति-प्रधान लीला ऐकून मन भक्तिभावानें उचंबळून आलें, तसाच आल्हाद झाला आणि त्याच भावनामय मनानें १९२५ सालीं प्रथमच शिरडीस बाबांच्या समाधि-दर्शनास जाण्याची प्रेरणा केली. त्याप्रमाणें त्यांच्यासह जाणें झालें. म्हणून त्या दिवसापासून त्यांच्या प्रत्येक पुण्यतिथीस (दसरा) जाण्याचा क्रम ठेविला आहे.

माझा मुलगा मनोहर हा अठरा महिन्यांचा असतांना तो चार दिवस फारच आजारी होता. चवथ्या दिवशीं तर त्यानें डोळेसुद्धां उघडले नाहींत. स्थिती निराशजनक होऊन आम्हांस चिंतेनें पूर्णपणे घेरलें आहे, तोंच रात्रौ ८-३० च्या सुमारास श्री. हेराम यांचें आमच्या घरीं येणें झालें. त्यांनीं पाहिलें तों काय मुलगा अत्यावस्थ स्थितींत! झालें! त्यांनीं तात्काळ आपल्या झोळींतून बाबांची उदी काढली, त्याच्या कपाळास व पोटास लावली. थोडा वेळ बसून त्यांच्या एका ओळखीच्या गृहस्थाकडे श्रीसत्यनारायणाची पूजा होती तिकडे मला घेऊन गेले. इकडे अकरा वाजतां मी परत घरीं येऊन पाहातों तों काय चमत्कार! मुलगा घरांत स्वच्छेनें खेळत आहे आणि तो इतका कीं, आजपर्यंत तो कधींच तो इतक्या ईर्षेनें खेळला नव्हता किंवा हांसलाही नव्हता, असे आमच्या आईनें उद्गार काढिले आणि पाहाणाराला तर त्याच्या मुखावर आजारीपणाची छटाही दिसली नसती. हा सर्व खेळ कसला? — तर बाबांच्या उदिचा! पुण्यात्म्याच्या दयेचा! झालें! घरांतील सर्व मंडळींचा उदिरुपी-विभूतिवर पूर्ण विश्वास बसला.

१९२८ सालीं दसरा आणि मोहरम एकाच दिवशीं आल्यामुळें मला रजा मिळण्यासारखी नव्हती. मला तर जाण्याची अतोनात उत्कंठा लागलेली. दसऱ्याच्या आधीं दोन दिवस, श्री साईबाबांचें दर्शन स्वप्नांत झालेलें आणि त्यांनीं एका कागदावर सही केलेली आहे असें दिसलें. मी जागा झालों व रात्री पाहिलेल्या मूर्तिबद्दल धन्यता वाटली. सकाळीं रजेसाठीं अर्जी केली. ताबडतोब रजा मंजूर झाली आणि मुलांमाणसांसह पुण्यतिथीस (शिरडीस) हजर झालों. दिवसेंदिवस घरांत सर्वांकडून बाबांचें मनस्मरण होऊं लागलें. कोणतेंही संकट आलें की, तें बाबांच्या कृपेनें पार होत असे व जरा कांहीं कमी जास्त झाल्यास तें बाबांना सांगावेसें वाटे. त्यावेळीं माझा मुलगा अडीच (२॥) वर्षांचा होता. पण त्याला जरा कोठें लागलें अगर पडला तर बाबांच्या प्रतिमेकडे जाऊन नमस्कार करून तो जवळ असलेली उदी लावित असे.

१९२७ सालीं पोलिस कमिशनर साहेबांकडून मला लिहून आलें कीं, तूं ॲक्टींग असल्यामुळें जुलैमध्यें कमी व्हावें लागेल, कारण नाशिकहून पास होऊन आलेल्या उमेदवारांना जागा रिकाम्या करून दिल्या पाहिजेत. आतां आमचे गाऱ्हाणें श्रीसमर्थ बाबांशिवाय कोण ऐकणार? पण हांकेला देवानें ओ दिला आणि पुन्हा तीन चार दिवसांनी हुकूम आला कीं, सध्यां तुम्हांला कमी करीत नाहीं.

गेल्या वर्षी (फेब्रुवारी १९२९) मुंबईत हिंदु-मुसलमानांचा दंगा झाला. त्या दंग्यांत दोन तीन दिवस झोंप नव्हतीच. पण दिवसांतून एक वेळसुद्धां जेवण मिळत नसे. एके दिवशीं मी परेल येथें मशीदीजवळ ड्युटीवर होतों. आदल्या दिवशीं माझा निराहार उपवास होताच. पण दुसऱ्या दिवशीं कांहींच खावयाला मिळालें नाहीं. संध्याकाळीं ३-१५ च्या सुमारास मला बरें वाटत नसल्यानें माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्यास मी सांगितलें. त्यांनीं थोडया वेळानें एका युरोपियन ऑफिसरास माझ्या जागेवर पाठविलें. मी घरीं गेलो. एका तासानें मला कळलें कीं, दंगेखोरांनीं माझ्या जागीं आलेल्या साहेबास (डेप्युटी इन्स्पेक्टर प्रिसली) ठार मारलें. धन्य धन्य त्या साई माऊलीची की जिनें मला दोन दारुण व बिकट प्रसंगीं तारलें!

पुढें आठ दिवसांनीं (१५ फेब्रुवारीस) मी आजारी पडलों. चार दिवस सतत औषधोपचार केला. बरें वाटेना म्हणून पोलीस-हॉस्पिटलमध्यें राहिलों. तेथें दुखणें टायफॉइडचें असल्याचें कळलें. ताप दिवसेंदिवस वाढू लागला. सतराअठरा दिवस झाले. जरी मी इतका आजारी होतों तरीं श्री समर्थ बाबांचें स्मरण वेळोवेळीं होत असे आणि दिवसांतून दोन तीन वेळां उदी लावीत असे. शेवटीं एका मंगळवारीं ताप फारच चढला. रात्रीं झोंप नसून मी फक्त गुंगींत होतों. तोंच एक भली मोठी काळी धिप्पाड व्यक्ति माझ्यासमोर आली व माझ्या पायाला धरून कॉटच्या बाहेर ओढलें; आणि मला घेऊन जाऊं लागली.

इतक्यांत दुसरा एक त्याहून भिन्न परंतु भव्य (तेजस्वी) मनुष्य आला आणि त्यानें मला काळ्या व्यक्तीच्या हातून सोडविलें. दोघांची झटापट सुरू झाली. मी बाबांना हाक मारली. त्याक्षणींच माझे बाबा, जसे मी प्रतिमेंत पाहात असें तसेंच प्रकट झाले. सुगंध सुटला, सबजाचा वास दरवळूं लागला. ''हे सद्गुरु भक्त-वत्सला, तुझी लीला अगाध आहे.'' साई माऊली अवतीर्ण होतांच ती काळी व्यक्ति एका क्षणांत नाहींशी झाली. मी घाबरून जागा झालों तों तीन वाजले. इकडे माझा ताप उतरण्यास सुरुवात झाली. ह्या आजारीपणात आमचे पूज्य वडील माझ्याजवळ होतेच आणि आई कोंकणांत गांवीं एकटीच होती. ती सुद्धां रात्रंदिवस मला बरें वाटावें म्हणून बाबांची प्रार्थना करीत असे. एके दिवशीं रात्रीं आमच्या आईच्या स्वप्नांत श्री बाबांनीं सांगितलें कीं, ''घाबरूं नकोस, तुझ्या मुलाला रजा देववून घरीं आणतों.'' या साईच्या केवळ आशीर्वादानेंच मला आठ-दहा दिवसांत रजा मिळाली आणि मी गांवीं गेलों. तीन महिन्यांनीं परत मुंबईस आलों. पुढें एक महिन्यानंतर नाशिकला ट्रेनिंगसाठीं न पाठवितां मला कायम केलें.

आमचे स्नेही आबा सावंत यांच्या घरी बाबांची एक तसवीर आहे. कधींकाळीं ते पूजा करीत असतात. त्यांची पत्नी कोंकणांतून पहिल्यानेंच मुंबईस आली आणि ती तसवीर पाहून ''ह्या म्हाताऱ्या मुसलमानाची तसबीर आमच्या घरांत कशाला ?'' असा प्रश्न विचारला. रा. आबा यांनीं आपल्यापरीनें श्री समर्थ बाबांची महति व महिमा सांगितला. पुढें कांहीं महिन्यांनीं त्यांनी एक नवीन लुगडें विकत आणलें आणि आपल्या पत्नीला म्हणाले कीं, आज बाबांनीं पैसे दिले म्हणून हें लुगडें आणलें आहे. त्यांच्या पत्नीचा बाबांवर मुळींच विश्वास नव्हता. ती म्हणाली, ''आपण आपल्या स्वकष्टार्जित पैशानें जर तें आणलें, तर तें बाबांनीं दिले असें कसें म्हणतां येईल ?'' ही वेळ संध्याकाळची होती. लुगडें पेटीवर ठेविलें होतें. रात्रीं जेवण झालें आणि लुगडें कसें काय आहे, रंग पक्का कीं कच्चा आहे, सूत बारीक कीं जाडें आहे म्हणून पाहाण्यासाठीं जों तिनें हात घातला तोंच, हातांत राख आली. सगळें लुगडें जळून राख होऊन जशीच्या तशी फक्त घडी राहिली. तिला फार वाईट वाटलें आणि प्रार्थना केली कीं, जर उद्यां पुन्हां माझें लुगडें मिळालें तर माझ्या गैरविश्वासामुळेंच मला देवानें शिक्षा दिली असें मी समजेन. दुसऱ्या दिवशीं रा. आबा यांस एका जुन्या कामाबद्दल दहा रुपये एका माणसानें आणून दिले. हे पैसे मिळण्यासारखे नव्हतेच आणि म्हणून त्यांना फार आनंद झाला. त्यांनीं आपल्या पत्नीला दुसरें एक नवें लुगडें आणलें. झालें. नवें लुगडें मिळतांक्षणींच त्यांच्या पत्नीचा बाबांवर पूर्ण विश्वास बसला, आणि त्या वेळेपासून बाबांची सेवा त्यांच्या घरांत सुरू झाली.

आम्ही आमच्या ऑफिसच्यावर (पोलीस स्टेशनवर) राहतो. एकदा मी ऑफिसमध्ये काम करीत असतांना, जिन्यावर कोणी तरी पडल्याचा भास झाला, आणि वाटलें कीं, आमचा मुलगा (त्या वेळीं तीन वर्षांचा होता) पडला. मी ताबडतोब ऑफिसमधून जिन्याजवळ आलों. तों (मुलगा) जिन्याच्या वरच्या पायरीवर खेळत होता. त्याला वर आंत जावयास सांगणार तोंच खालच्या पायरीवर घसरला आणि तेथून अकराव्या दगडी पायरीवर पडणार इतक्यांत मी हात पुढें केल्यामुळें तो अलगद माझ्या हातावर पडला. ईश्वर कृपेनें त्याला कांहींच लागलें नाहीं.

प्रत्येक पुण्यतिथीला मी कुटुंबासह शिर्डीस जात असतोंच. १९२८ सालीं आमची मंडळी गांवीं असल्यामुळें मी एकटाच शिर्डीस गेलों. गांवीं जाण्यापूर्वी आमची पत्नी म्हणत होती कीं, दसरा झाल्यावर गांवीं जाईन. हेतु हा कीं, शिर्डीला जाणें होईल. पण प्रकृति अगदींच नादुरुस्त असल्यामुळें तिला दसऱ्यापूर्वीच पाठविलें. दसऱ्याच्या दिवशींच रात्रौ श्रीसद्गुरु बाबांनीं आमच्या कुटुंबाच्या स्वप्नांत येऊन भेट दिली. आणि त्याबरोबरच शिर्डीचा हुबेहुब देखावाही दिसला. श्रीबाबांच्या दर्शनाला जाण्याची उत्सुकता अनिवार झाली कीं, बाबांनीं त्याला आपल्या दर्शनास आणलेंच असे किती तरी अनुभव बाबांच्या भक्तगणांत आहेत.

गेल्या दसऱ्याचीच गोष्ट. आमच्याबरोबर दुसरी कांहीं मंडळी शिर्डीला येणार होती. या मंडळींपैकीं कोणीही पूर्वी शिर्डीला गेलेले नव्हते. म्हणून त्यांना बोरीबंदर स्टेशनवर भेटावयाला सांगितलें होतें. आम्हीं (मुलांमाणसांसह) वेळींच स्टेशनवर पोहोंचलों. आमच्या तिकीटा काढल्या आणि मुलांना गाडींत व्यवस्थेशीर बसविलें. मी ठरविलेल्या जागीं येणारी मंडळी भेटलीं नाहींत म्हणून त्यांना स्टेशनवर शोधीत राहिलों. मंडळी दिसली. त्यांनीं तिकिटाही काढल्या नव्हत्या. घाई करून ओळखीनें तिकिटा मिळविल्या. त्या वेळीं फक्त सात मिनिटें राहिलीं होतीं. थर्ड क्लासच्या दरवाज्याजवळ आलों, पण तिकीट कलेक्टर आंत सोडीना. तेथून पळ काढीत स्टेशनच्या हॉलकडील दरवाज्यानें आंत शिरण्याचा प्रयत्न केला; परंतु तेथेंही तिकीट कलेक्टर आंत सोडीना. गाडी सुटावयाला तीन मिनिटें राहिलीं होती. त्यानें फक्त मला आंत सोडलें होतें. मंडळी निराश झाली. मागाहून दुसरी गाडी आहे हें आम्हांला माहीत नव्हतें. आमच्यापैकीं कोणी एक निराश होऊन ''बाबांची इच्छा'' असें म्हणाला. इतक्यांत एक प्यासेंजर तेथें आला, त्यानेंही स्वतःसाठीं विनवणी केली; परंतु तिकीट कलेक्टर कांहीं केल्या ऐकेना. तेव्हां तो तिकीट कलेक्टरच्या हाताखालून प्लॅटफॉर्मकडे पळाला. तिकीट कलेक्टरही त्याच्या मागून धांवला. दरवाजा मोकळा झाला. आम्ही सर्व मंडळी स्वस्थपणें गाडींत बसलों. तोंच गाडी सुटली. ही बाबांची कृपा नाहीं काय? म्हणून देवावर जितका जास्त

भरंवसा ठेवावा तितकाच तो आपली काळजी वाहतो. सद्गुरुमाउली तिच्या भक्तांत भेदाभेद मानीत नाहीं; पण विश्वास मात्र पाहिजे.

**नागेश आत्माराम सावंत**

(श्री साईलीला, अंक ३-४, वर्ष ७ वें)

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील पश्चिम विभागांत पाचोरें म्हणून एक तालुका आहे व पाचोरें हा गांव तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. कै. नानासाहेब चांदोरकर हे त्याच जिल्ह्यांत दुसऱ्या एका तालुक्यावर मामलेदार होते. पाचोऱ्यापासून सुमारे ८-१० मैलांवर पद्मालय म्हणून एक ठिकाण आहे. तेथून सुमारें दीड मैल अंतरावर रानांत एक वंदनीय सिद्ध पुरुष श्री. गोविंदबुवा म्हणून राहात असत. गोविंदबुवानीं तेथें एक भव्य व दर्शनीय असें श्रीगणपतीचें मंदिर बांधलें व त्यास १०० तोळे सोन्याचा कळस चढविला. हे मंदिर जंगलांत होतें व गोविंदबुवा या मंदिरापासून थोडयाशा अंतरावर एका लहानशा मठींत राहात असत. दररोज प्रात:काळीं मंदिरांत येऊन तेथील गजाननाची पूजाअर्चा आटोपून आल्या-गेल्याचा योग्य परामर्ष घेत असत. त्याची जेवणाखाण्याची व निजण्याबसण्याची सर्व सोय तेथें करीत व रात्रीं १० वाजतां मंदिराचे दरवाजे बंद करून मठींत परत जात. स्वत: महाराज रोज दोन्हीं वेळ मिळून फक्त १८ तोळे चहा घेऊन राहात. जेवणाचें फराळाचें निरशनाचें वगैरे कांहीं खात नसत.

एकदां नानासाहेबांस अशी उत्कट इच्छा झाली कीं, या गोविंदमहाराजांचें दर्शन घ्यावें. त्यांनी आपला मनोदय त्यांच्या नित्य बैठकींत असणाऱ्या २-३ गृहस्थांस कळविला व पद्मालयास जाण्याचा दिवस नक्की करून पाचोरें मामलेदार साहेबांस आम्ही अमुक दिवशीं अमक्या वेळीं अमक्या गाडीनें पद्मालयास जाण्यासाठीं पाचोरें स्टेशनावर येतों, त्यावेळीं आपला तांगा तेथें हजर ठेवावा, असें पत्र लिहिलें.

ठरल्या दिवशीं नानासाहेब वगैरे मंडळी पाचोऱ्यास जाण्याकरतां ज्या स्टेशनवर बसावयाचें त्या स्टेशनवर आली. परंतु तेथें त्यांना येण्यास उशीर लागल्यामुळें त्यांची ठरलेली गाडी चुकली व ते नंतरच्या गाडीने पाचोऱ्यास आले. पाचोरें मामलेदारसाहेबांनीं ठरलेल्या गाडीच्या वेळीं स्टेशनावर तांगा पाठविला. त्या गाडींत नानासाहेब वगैरे मंडळी नाहींत असें पाहून तांगेवाला तांगा परत घेऊन गेला. दुसऱ्या गाडीनें ही मंडळी आली. त्यांनीं स्टेशनवर तांगा आला होता काय म्हणून चौकशी केली. पूर्वीच्या गाडीनें येणारी मंडळी आली नाहींत असें पाहून तांगेवाला परत गेला असें स्टेशनवर असलेल्या लोकांनीं नानासाहेबांस सांगितलें. नानासाहेबांची गाडी चुकल्यामुळें ते दुपारी येण्याऐवजीं पाचोरा स्टेशनवर सायंकाळीं आले. तेथून पद्मालयास जाण्याचा रस्ता म्हणजे राजरस्ता नसून जंगलांतील आडरस्ता. नानासाहेब वगैरे मंडळीनीं तो रस्ता कधीं पाहिलेला नाहीं व नानासाहेबांस ८-१० मैल चालण्याचीही कधीं संवय नाहीं. परंतु पायीं जाण्याखेरीज दुसरें साधनच नाहीं असें आढळून आल्यावर त्या सर्वांनीं पद्मालयास पायीं जाण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें लगेच एक वाटाड्या बरोबर घेऊन ते चालूं लागले. रात्रींचा ७-८ वाजण्याचा समय. रात्र काळोखी, जंगलचा दगडाळ व उंचसखल रस्ता. सकाळीं एक वेळ भोजन झालेलें. बरोबर फराळाचे किंवा खाण्याचे पदार्थ कांहीं नाहींत. अशा स्थितींत ते गप्पागोष्टी बोलत निघाले. पण ५-६ मैल गेल्यावर मात्र अतिशय थकले. नानासाहेबांना पुढें पाऊल टाकवेना. ते सर्वजण तेथेंच रस्त्यांत एके ठिकाणीं बसले व विचार करूं लागले कीं अशा वेळीं परत जाण्यांतही मतलब नाही व पुढें पद्मालयालाही जाण्यांत अर्थ नाहीं. कारण पाचोरें फार लांब. भलत्याच वेळीं आपण तेथें पोंचणार. पद्मालय जवळ, पण आपण फार थकलों असल्यामुळें आपल्यास १० वाजण्याचे आंत तेथें पोंचता येणार नाहीं. कारण १० वाजतां महाराज मंदीर बंद करून आपल्या मठींत निजावयास जातात. मग आपली जेवणाखाण्याची व निजण्याची सोय तेथें जंगलांत लागणार कशी? सकाळीं लवकर भोजन झालें असल्यामुळें त्यांना खूप ताण बसला व चालण्याच्या श्रमामुळें त्या सर्वांना खरपूस भूक लागली. पण करणार काय? खरोखरच अशा वेळीं श्री सद्गुरुमाउलीवांचून कोणास दया येणार व कोणाचा जीव कळवळणार? श्री सद्गुरुमाउलीवर नानासाहेबांची निष्ठा बलवत्तर. बसल्या बसल्या व चालतां चालतां श्रीगुरुमाउलीचा धांवा करण्याचा मनांतल्या मनांत सपाटा चालविला. थोडा वेळ चालावें–थोडा वेळ बसावें असा क्रम चालला. मध्येंच उभें राहावें व म्हणावें कीं, "बाबा, मला आतां जेवणाखाण्यास कांहीं न मिळालें तरी चालेल, एक मोठा गडवाभर चहा मिळाला म्हणजे रात्रीचे काम भागेल. परंतु हें व्हावें कसें. गोविंद महाराजांना ही गोष्ट सांगणार कोण व महाराज माझ्यासाठीं १० वाजल्यानंतर नित्यनेमाचें अतिक्रमण करून मंदिरांत काय म्हणून राहातील व माझी चहाची तजवीज कां करून ठेवतील? बाबा, आपणच जर मनांत आणलें तर ही दिसण्यांत असंभवनीय दिसणारी गोष्ट संभवनीय होण्यास अवधि कसला!"

भगवान ज्ञानेश्वर महाराज श्रीमद्भगवद्गीतेच्या १५ व्या अध्यायाच्या प्रारंभीं श्री ज्ञानेश्वरी भाष्य प्रस्तावनेच्या २३ व्या ओवींत म्हणतात कीं–

**आधणीं घातलिया हरळ। होती अमृताचे तांदुळ।**
**जरी भुकेची राखे वेळ। श्री जगन्नाथ॥**

खरोखरच पूर्णब्रह्म जगन्नाथ बाबा नानासाहेबांची क्षुधेमुळें

अशी व्याकूळ झालेली स्थिति पाहून अंत:करणांत कळवळले. त्यांना नानासाहेबांच्या भुकेची वेळ राखावयाची होती व तीही श्री गोविंद बुवांसारख्या पुण्यपुरुषाच्या हातून! मग काय कमी? बिन तारेच्या तारायंत्रास किंवा ध्वनिवाहक यंत्रास तारा जरी नसल्या तरी दोहीकडे दोन स्टेशनें, यंत्रें, ऑफिसें व बातमी घेणारीं किंवा ध्वनि ऐकणारीं माणसें तरी लागतात. आधुनिक आधिभौतिक ज्ञानाच्या जोरावर मानवजातीच्या सुधारणेची जी मजल येऊन ठेपली आहे ती इतकीच व याच सुधारणेचे आम्ही गोडवे किती गातों, कौतुक किती करतों, तिच्या प्रवर्तकास धन्यवाद किती देतों व अशा सुधारणेच्या काळांत आम्ही जन्मास आलों म्हणून आम्ही आपल्यास धन्य किती मानून घेतों. परंतु ज्या परमात्मज्ञानापुढें हें ज्ञान म्हणजे दर्या में खसखस सुद्धां शोभणार नाहीं, त्या पूर्णब्रह्म संतांच्या ज्ञानाचें वर्णन कोण करणार? त्यांना इकडची बातमी लाखों मैलांवर किंवा सात समुद्रांच्या पलीकडे पोंचविण्यास यंत्रांची उभारणी करावी लागत नाहीं, स्टेशनें बांधावीं लागत नाहींत, बातमी घेण्यास माणसें ठेवावीं लागत नाहीत, ऑफिसें उघडावीं लागत नाहींत किंवा कोणत्याही प्रकारचा गाजावाजा करावा लागत नाहीं.

काय चमत्कार! श्रीसद्गुरुमाउलीच्या कानावर आपलें भुकेचें गाऱ्हाणें घालीत घालीत व दमल्या थकल्या पायांवर लवकर चालण्याबद्दल प्रोत्साहन देत देत रात्रीचे दहा वाजल्यानंतर काळोखांतून पद्मालयाचे मंदिरानजीक येतात न येतात इतक्यांत ज्ञानघन श्री गोविंदमहाराजांची मूर्ति गरमागरम मधुर, स्वादु, अमृततुल्य चहानें भरलेली मोठी चरवी हातात घेऊन मंदिरद्वारांतून बाहेर येऊन "नाना आलास?" म्हणून महाराजांनीं नानासाहेबांस विचारलें. होय, आलों असें म्हणून नानासाहेबांनीं व बरोबरच्या सर्व मंडळींनीं महाराजांस वंदन केलें. नंतर नानासाहेब बोलले कीं महाराज, आपण आज या वेळीं येथें कसे? महाराज म्हणाले, "अरे, नाना फार लांबून पायीं चालत येत असल्यामुळें अतिशय थकला आहे, त्याला फार भूक लागली आहे. करितां त्याच्याकरितां एक मोठा तांब्याभर चहा तयार करून ठेव" असे आतांच बाबांकडून सांगणें झाल्यामुळें तुला मी हा चहा घेऊन आलों आहे. अहाहा! काय हें अद्भुत अंतरसाक्षित्व! काय ही उभय ज्ञानमूर्तीची भाषा! केवढा हा बाबांबद्दल गोविंद महाराजांस आदर! व केवढा बाबांच्या भक्तांबद्दल गोविंद महाराजांस कळवळा! या सर्व गोष्टीबद्दल नानासाहेबांस अत्यंत आश्चर्य वाटून त्यांना अत्यानंद वाटला व श्रीसद्गुरुमाउली बाबांच्या विश्वव्यापकतेबद्दल प्रेमातिशय कौतुक वाटलें. महाराजांनीं सर्वांची निजण्याची सोय मंदिरांत केलीच होती. मग नानासाहेब आदीकरून सर्व मंडळींनीं महाराजांनीं दिलेला चहा त्यांचा पुण्य प्रसाद मानून श्रद्धा व प्रेमपूर्वक मोठ्या आदरानें त्याचा यथेच्छ समाचार घेतला. चहा सर्वांना पुरून उरला होता. सर्व मंडळी नंतर झोंपीं गेली व महाराज आपल्या मठींत गेले. दुसरे दिवशीं मंडळी मंदिरांतील भोजनप्रसाद घेऊन परत आपल्या गांवीं गेलीं.

ज्या विश्वसृट्र विश्वाश्रय, विश्वसंहारक, विश्वरंगभू नाट्याचार्य बाबांच्या प्रेरणेनें हा लेख लिहिण्याची स्फूर्ति झाली त्या श्रीसद्गुरु साई गंगाधराच्या पुण्य, दिव्य व पवित्र चरणसरोवरही श्रद्धासमन्वित, अनन्य प्रेमभावानें, शिरोभागीं लिहिलेला श्लोक, त्याखालीं लिहिलेला मजकूर व शेवटीं लिहिलेला अनुभव हें त्रिदल अति विनयपूर्वक अर्पण करून आपली रजा घेतों.

– बाबांचें बाळ

ठाणें.

"तयीं मजवरी करितां घाव। उलट प्रकटतां सुवर्णभाव। माझें दगडपण जाहलें वाव। अनुभव नवलाव दाटला॥१५९॥ विना अभिमान अणुप्रमाण। मज हृदयस्था यावें शरण। होईल अविद्या तात्काळ निरसन। श्रवणकारण संपेल॥१६०॥ अविद्या प्रसवे देहबुद्धी। देहबुद्धीस्तव आधि-व्याधि। तीच कीं लोटी विधिनिषेधीं। आत्मसिद्धीविघातक॥१६१॥ म्हणाल आतां मी आहें कोठें। आतां मी तुम्हां कैसा भेटें। तरी मी तुमचिया हृदयींच तिष्ठें। विनाकष्टें सन्निकट॥१६२॥ म्हणाल हृदयस्थ कैसा कोण। कैसें काय त्याचें लक्षण। ऐसी काय तयाची खूण। जेणें त्या आपण जाणावें॥१६३॥ तरी व्हावें दत्तावधान। परिसा तयाचें स्पष्ट व्याख्यान। जयालागीं जाणें शरण। तो हृदयस्थ कोण हें आतां॥१६४॥ नाना नामें नाना रूपें। सृष्टीमाजीं भरलीं अमूपें। जयांचीं कवणा ना करवती मापें। मायेचीं स्वरूपें तीं अवघीं॥१६५॥ तैसेंच सत्त्वरजतमगुण। तयां त्रिगुणां ओलांडून। सत्तेचें जें स्फुरे स्फुरण। तें रूप जाण हृदयस्थाचें॥१६६॥ नामरूपविरहितपण। उर्वरित जें तुझें तूंपण। तेंच हृदयस्थाचें लक्षण। जाणूनि शरण त्या जावें॥१६७॥ मीच तो तूं ऐसें पाहतां। हीच दृष्टी पुढें विस्तारतां। भूतमात्रीं ये निजगुरुता। ठाव न रिता मजविना॥१६८॥ ऐसा अभ्यास करितां करितां। अनुभवा येईल माझी व्यापकता। मग तूं मजसीं पावूनि समरसता। पूर्ण अनन्यता भोगिसील॥१६९॥ चित्स्वरूपीं अनुसंधान। लाधेल होशील शुद्धांत:करण। घडेल हें तुज गंगास्नान। गंगाजीवन नातळतां॥१७०॥ प्रकृतिकर्माचा अभिमान। जेणें पावे दृढबंधन। तया बिलगूं न देती सज्ञान। अंतरीं सावधान सदैव॥१७१॥ स्वस्वरूपीं मांडूनि ठाण। चळे न तेथून अणुप्रमाण। तया समाधी वा उत्थान। नाहीं प्रयोजन उभयांचें"॥१७२॥

– अध्याय ४४, श्री साईसत्चरित

## साईभक्तांचे अनुभव... ८

# रघुवीर भास्कर पुरंदरे (५९बी, पेरी रोड, वांद्रे)

**(४ मे १९३६)**

मूळ लेखक– **कै. बी. व्ही. नरसिंहस्वामी, मद्रास.**
मराठी भाषांतर– **श्री. शं. बा. पटवर्धन, मुंबई.**

बाबांचे नाव मी १९०९ साली ऐकले. साधुसंतांविषयी मला नेहमीच आकर्षण वाटे. ते संत आहेत असे कळल्यावर माझी उत्सुकता जास्तच वाढली. मग बाबांनी स्वप्नात दर्शन देवून मला शिरडीस बोलावले. माझी मुलगी त्यावेळी आजारी होती म्हणून "आई, शिरडीस जावूया नको", असे म्हणाली. पण ते न ऐकता मी, माझी मुलगी, पत्नी व आई असे मिळून आम्ही शिरडीस गेलो. तेरा दिवस तेथे राहिलो. तीन दिवसानंतर माझी मुलगी बरी झाली. गेली सात शतके माझा व त्याचा संबंध आहे, असे बाबांनी आईला सांगितले व पुढे म्हणाले, "मी त्याला कधीही विसरणार नाही. सदैव त्याची आठवण ठेवीन. तो हजारो मैल दूर असला तरी त्याच्याशिवाय एक घासही तोंडात टाकणार नाही." तेरा दिवस झाल्यावर बाबांनी परवानगी दिली व आम्ही नाशिकला आलो. तेथून दादरला आमच्या घरी आलो. परत आल्यावर माझ्या पत्नीला कॉलरा झाला व डॉक्टरांनी केस हाताबाहेर गेल्याचे सांगितले. मी बाबांची उदी व तीर्थ तिला दिले. आमच्या घरासमोर दत्तमंदिर आहे. त्याच्याशेजारी बाबा उभे असलेले मला दिसले. त्यांनी मला उदी व तीर्थ देण्यास सांगितले. दोन्ही तिला दिल्यावर तिच्या अंगात तरतरी आली व नंतर तिची तब्बेत पूर्ण सुधारली. तेव्हापासून मी वरचेवर शिरडीस जाऊ लागलो व बाबा सांगतील तितके दिवस तेथे राहू लागलो. काही वेळा बाबा दीक्षितांना मला पत्र लिहून बोलावून घेण्यास सांगत. मी दीक्षितांबरोबर पुष्कळ वेळा शिरडीस जात असे. मी मनात कोणतीही ऐहिक कामना न बाळगता त्यांच्याकडे गेलो. माझी विष्णू ही इष्टदेवता असल्याने तिची मी उपासना करीत असे. बाबांनी मला ती पुढेही चालू ठेवण्यास सांगितले.

बाबांनी बऱ्याच वेळा माझ्याकडे दोन रुपयांची दक्षिणा मागितली. "बाबा, नेहमी तुम्ही दोन रुपयेच का मागता?" असे मी त्यांना विचारले असता ते म्हणाले, "मला रुपये नकोत. निष्ठा व सबुरीरूपी दोन रुपये हवेत." "ते मी तुम्हाला दिले आहेत", असे मी उत्तर दिले. त्यावर ते म्हणाले, "निष्ठा बळकट कर व सत्याची चाड धरून वाग. जी आश्वासने देशील ती पूर्ण करीत जा. असे केलेस तर तू जेथे असशील तेथे सर्वकाळ मी तुझ्याजवळ राहीन." माझ्या मनोनिग्रहाच्या प्रयत्नात त्यांचे सहाय्य मिळावे, असे मी त्यांना विनविले आणि सहाय्य करण्याचे त्यांनी कबूल केले. हे सर्व पहिल्या मुक्कामातच झाले. मग बाबांनी मला घर विकत घेण्यास सांगितले. तेव्हा माझा पगार द.म. ३५ रु. होता. घराबद्दल ते बोलल्यावर लगेच मी एक प्लॉट विकत घेतला व तीन वर्षांत घर बांधून तयार झाले. सध्या रहात असलेले ते हेच घर होय! बाबांनी निक्षून सांगितले होते की कोणाकडे एक पै मागावयाची नाही. मीच तुला मदत करीन. नानासाहेब चांदोरकर व काकासाहेब दीक्षितांनी घर बांधून देण्याचे आश्वासन दिले; पण बाबांनी त्याला परवानगी दिली नाही. मग मी आमच्या ऑफिसातून ५०० रुपये कर्ज घेवून ते घर बांधले. ते अगदी निर्मनुष्य ठिकाणी होते. पण बाबा म्हणाले, "मी स्वत: तेथे येवून राहीन आणि तुझे व तुझ्या पत्नीचे संरक्षण करीन." त्यानुसार मी तेथे राहू लागलो.

१९२० साली माझी पत्नी वारली. मी सत्यानेच वागावे यावर ते नेहमी भर देत. मी सध्या शिरडी संस्थानचा संयुक्त खजिनदार आहे. देह ठेवल्यानंतर बाबा स्वप्नात येवून शिरडीस जावून अमूक अमूक कामे करण्याबद्दल सूचना देत. मी जे करीत होतो किंवा करण्याची जरुरी होती त्या साऱ्या बारीकसारीक बाबींवर बाबांचे पूर्ण नियंत्रण असे. त्यांनी मला व दीक्षितांना एकमेकांशी सहकार्य करण्याबद्दल सांगितले व त्याप्रमाणे आम्ही दोघांनी ते पाळले. ते माझ्याशी 'ध्यान' या विषयावर कधी बोलले नाहीत. तसेच माझी उपासना कर, असेपण म्हणाले नाही. शंकर किंवा विष्णू यांपैकी तुला इष्ट वाटेल त्याची उपासना कर, असे सांगितले. त्यांनी भक्तांना त्यांच्या त्यांच्या उपास्य दैवतांच्या रूपात दर्शन दिले आहे.

सन १९१३च्या सुमारास माझी आई मला पंढरपूरला जाण्याबद्दल आग्रह करीत होती. मी बाबांकडे याकरिता परवानगी मागितली नाही. बाबांनी स्वत:हून तो विषय काढला व आईला विचारले, "तुमचा केव्हा निघायचा बेत आहे?" मग आईला व पत्नीला त्यांनी मशिदीत विठ्ठल-रखुमाईच्या रुपात दर्शन दिले. त्यांना अतिशय आनंद झाला व पंढरपूरचा बेत त्यांनी रद्द केला. यानंतर ती नेहमी म्हणे की तिचा देव शिरडीत असून शिरडी हेच तिचे पंढरपूर आहे. एकदा माझी पत्नी प्रसूत होण्याच्या अगोदर आजारी पडली. तिच्या स्वप्नात बाबांनी येवून तिला

उदी लावली. लगेच ती उठून ओरडली, "अहो, उठा, बाबांनी येवून धुनीतली गरम उदी मला लावली आणि मला चटका बसला." पुढे ती बरी झाली. असे बाबांनी खूप वेळा दर्शन दिले आहे. मोठ्या आपत्तीत सापडलो की मी त्यांच्या फोटोसमोर बसून रडत असे. त्यावेळी लगेच प्रगट होवून ते माझे सांत्वन करून मार्गदर्शन करीत असत. नानासाहेब चांदोरकर जामनेरला असताना त्यांची मुलगी प्रसूतीच्यावेळी अडली होती. त्याच वेळेस बाबांनी पाठविलेला माणूस रामगीर गोसावी शिरडीहून उदी घेवून आला. पण ज्या टांग्यातून तो जामनेरला पोचला तो टांगा व टांगेवाला हे दोन्ही अदृश्य झाले. उदीचे सेवन करताच मुलीची सुटका झाली. नानासाहेबांचे दोन मुलगे बाबू व बापू कल्याणला चांदोरकरवाड्यात राहतात. त्यांची मुलगी पुण्यात राहते. नानासाहेबांना स्वतःच्या संस्कृत भाषेच्या ज्ञानाबद्दल फार अभिमान होता, पण बाबांनी त्यांना "तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया" या श्लोकाचा दुसऱ्या दृष्टिकोनातून अर्थ समजावून सांगितला. द्वैताद्वैताबद्दल बाबा माझ्यासमोर कधी बोलले नाहीत. 'अल्ला मालिक है' 'अल्ला अच्छा करेगा' असेच ते म्हणत. 'ज्याचे पाय या मशिदीस लागतील त्याचा बेडा पार होईल' असे त्यांचे सांगणे असे. 'जैसी जिसकी नियत वैसी उसकी बरकत' असेही ते म्हणत. सन १९१३ वा १९१४ साली ते म्हणाले, "लोक समजतात की आपण सर्व निरनिराळे आहोत. पण हा चुकीचा समज आहे. मी तुमच्यात आहे व तुम्ही माझ्यात आहात, अशा भावनेने तू चिंतन कर म्हणजे तुला तसा अनुभव येईल." बाबांनी स्वतःच्या देहविसर्जनाची पूर्वसूचना १९१६ सालच्या दसऱ्याच्या दिवशी दिली होती. स्वतःची कफनी, लंगोट, डोकीचे वस्त्र ही सर्व त्यांनी धुनीत फेकून दिली व म्हणाले, "हेच माझे सीमोल्लंघन आहे." तेव्हा ते सुमारे दोन तास दिगंबर अवस्थेतच होते. क्रोधाने लाल झाले होते. त्यानंतर नवी कफनी, नवा लंगोट व डोक्याला नवे वस्त्र त्यांनी परिधान केले. याच वर्षी रामचंद्रदादा पाटील यांना त्यांनी सांगितले की १९१८च्या दसऱ्यास तात्याबा पाटील देह ठेवील. त्यावर्षीची नवरात्र सुरु झाली व तात्याबा आजारी पडले. दिवसेंदिवस त्यांचा आजार वाढतच गेला. दसरा उजाडला. बाबांनी इकडे दुपारी देह ठेवला आणि तिकडे तात्याबा वाचले. लोक म्हणाले की तात्याबाला वाचविण्यासाठी बाबा स्वतः मरणाला सामोरे गेले. अजूनही बाबा भक्तांचे प्राण वाचवितात. १९३२ साली सायटिका व संधिवाताने मी आजारी पडलो. माझ्या अंथरुणाजवळ यमदूत आलेला मी पाहिला. इतक्यात बाबा तेथे आले. माझ्याशेजारी बसून माझा हात त्यांनी स्वतःच्या मांडीवर ठेवला व यमदूतास मला स्पर्श करू दिला नाही. त्यामुळेच मी वाचलो.

मी फार रागीट होतो. ते मला नेहमी सांगायचे, "कोणी येवून तुला शिव्या देवू लागला किंवा अद्वल घडवतो म्हणाला, तर त्याच्याशी भांडू नकोस. तुला ते सहन झाले नाही तर एखादाच शब्द त्याच्याशी बोल किंवा तेथून निघून जा, पण वादावादी करू नकोस. तुम्ही इतरांशी भांडू लागलात की मला दुखणे येते."

देह ठेवण्याच्या अगोदर १२/१५ दिवस बाबांनी मला व दीक्षितांना मुंबईस घालवून दिले. मशिदीत निरोप घेताना ते म्हणाले, "माझी तुरबत तुमच्याशी बोलेल. माझी माती तुम्हास उत्तर देईल." त्यावेळेला त्यांना कोणताच आजार नव्हता आणि म्हणून त्यांचा मृत्यू निकट आहे, असे आम्हास मुळीच वाटले नाही. याच्याअगोदरही त्यांनी वरच्यासारखे उद्‌गार काढले होते. पण त्यांचे मर्म आमच्या लक्षात आले नव्हते. "काकास विमानातून घेवून जाईन", असे ते म्हणाले होते. त्याप्रमाणे काकासाहेबांचे निधन १९२६ मध्ये एकादशीच्या दिवशी झाले. ते म्हणत, "जो माझा माणूस आहे त्याचे निधन १००० मैलांवर जरी झाले तरी चिडीचे पोर दोर बांधून आणावे तसे त्याला मी माझ्यापाशी खेचून आणीन. एखाद्याला मी माझा म्हटले की मी त्याला कधीच सोडणार नाही." काही भक्तांनी बाबांच्या चरणांपाशी देह ठेवला. त्यांना निश्चितच सद्‌गती मिळाली असेल.

१९१६ मध्ये एका बाईने बाबांना विचारले, "मला चांगला जन्म केव्हा येईल?" बाबा म्हणाले, "पुढील जन्मी". हे ऐकून तिने विहीरीत उडी मारली, पण लोकांनी तिला वाचविले.

सगुण मेरु नाईक यांना बाबांनी सांगितले होते की त्यांनी रोज भातावर तूप घालून तो ताटातून आणावा आणि त्यातला थोडा धुनीमाईला अर्पण करून उरलेला बाबांना द्यावा. बाबा तो खात असत. तेव्हापासून आजतागायत सगुणने त्यात खंड पाडला नाही. बाबांनी सामिष अन्न सेवन केल्याचे मी कधी पाहिले नाही. एकदा त्यांनी माझ्याजवळ असलेली तांब्याची नाणी मागून घेतली. त्यांचे त्यांनी काय केले हे मला माहीत नाही. अशा जुन्या नाण्यांची चवड वस्त्रात व्यवस्थित बांधून ते स्वतःच्या खिशात ठेवत असत. एकदा त्यांनी माझ्याकडे दक्षिणा मागितली. मी माझ्याजवळ असलेली सर्व नाणी दिली. तरी बाबा म्हणाले, "तुझ्याकडे अजून एक-दोन आण्याचे नाणे आहे, बघ." मी ते त्यांना दिले. असे बऱ्याच लोकांकडून त्यांच्याजवळ असलेले सर्व पैसे ते मागून घेत. यात त्यांचा काय हेतू असे ते मला कळले नाही. कोणीतरी त्यांना इतक्या पैशांची जरुरी काय, असे विचारले. त्यावर ते म्हणाले, "मी येणाऱ्या प्रत्येकाकडे मागत नाही. फकीर (देव) ज्याच्याकडे बोट दाखवितो त्याच्याकडेच मी मागतो. पण त्याच्या बदल्यात मला घेतलेल्याच्या दसपट त्याला द्यावे लागतात. माझ्या उपयोगासाठी मी एक पै घेत नाही. मला घरदार किंवा संसार नाही". गायक, तमासगीर, फकीर वगैरेंना ते सढळ हाताने पैसे देत. तसेच धुनीसाठी सर्पणही पुष्कळ घेवून ठेवीत. मशिदीतील तुलसीवृंदावन १९११/१२ साली बांधले गेले. आम्हा सर्वांचा

हातभार त्याला लागला. सभामंडप १९१२ साली बांधण्यात आला. श्रीमंत दादासाहेब खापर्डे साठेवाड्यात पंचदशीवर निरुपण करीत असत. ते श्रवण करण्यास उपासनीबाबाही येत असत. मी इतर कामात गुंतलेला असल्याने माझे साठेवाड्यात जाणे घडत नसे. निवृत्त मुन्साफ नूलकर आयुष्यातील अखेरच्या दिवसांत शिरडीत रहात होते व तेथेच त्यांनी देह ठेवला.

सन १९१५ साली बाबा दम्याने फार आजारी झाले. ते त्यावेळेस काहीच खात नव्हते. श्वासोच्छ्वास करणेही त्यांना जड जात होते. ते पाहून मी रडू लागलो. बाबा म्हणाले, "रडतोस कशाला?" मी म्हणालो, "बाबा, माझ्याने हे बघवत नाही." बाबा म्हणाले, "भिऊ नकोस. दोनचार दिवसात मी बरा होईन. परमेश्वराने हा आजार भोगण्यासाठी पाठविला आहे. या मुदतीत तो मला बरे करील. दोन-तीन दिवस मी तुझी आठवण काढीत आहे आणि काकाला सांगितले की तुला येण्याबद्दल कळव." मग बाबाच काकासाहेबांना म्हणाले, "तू पत्र लिहू नकोस. तो इकडे येतच आहे." ते आजारी असल्याचे माहीत नसतानाही मी तेथे पोहोचलो. सर्वसाधारणपणे आजारात ते कधीच औषध घेत नसत. या आजारातसुद्धा भक्तांच्या आधाराने ते भिक्षा मागावयास जात, पण भिक्षान्न ते खात नसत. त्यांच्या रोजच्या कार्यक्रमात म्हणजे लेंडीला जाणे, सायंकाळच्या फेरीला जाणे, भिक्षा मागणे वगैरेत काही खंड पडला नाही. ते आजारी असताना एके दिवशी एका घराच्या माडीवर चढून तेथून दुसऱ्या घराचे छप्पर ओलांडून पलीकडे उतरले. त्यांना एका माणसाने उचलून खाली आणले. त्या माणसाला ३/४ रु. त्यांनी दिले व म्हणाले, "कोणाचेही श्रम फुकट घेवू नयेत." दुसऱ्या घरात राधाकृष्णमाई रहात होत्या. हे सर्व मी पाहिले. नंतर एका भक्ताने त्यांच्यासाठी चाकांची खुर्ची आणून दिली, पण बाबांनी तिचा वापर कधीच केला नाही. मालेगावचा फकीरबाबा, ज्याला बाबा बडेमियाँ असे प्रेमाने म्हणत, त्याला बाबा रोज भरपूर पैसे देत असत.

१९२० साली माझी पत्नी इन्फ्लुएंझाने गंभीर आजारी झाली. आजारामुळे रामनवमीच्या उत्सवाला जाता येत नाही याचे तिला वाईट वाटले. त्याच रात्री बाबा तिच्या स्वप्नात येवून म्हणाले, "रडू नकोस, मी तुला रामनवमीच्या उत्सवास नेईन." दुसऱ्या दिवशी सकाळी हे तिने मला सांगितले. तिला थोडी तरतरीही वाटू लागली, पण आजार बळावला आणि रामनवमीला 'बाबा बाबा' असे म्हणतच तिने प्राण सोडला.

रामनवमीच्या दिवशी सकाळी १० ते १२ निशाणांची मिरवणूक निघते. मशिदीच्या दोन्ही टोकांवर ती बांधल्यावर रामजन्माचे कीर्तन सुरु होते. मुसलमान भक्त येवून मग कुराण पठण करतात. त्यानंतर बाबांची संदल मिरवणूक निघते. त्यात आम्ही हिंदू भक्तमंडळी भाग घेतो. तसेच निशाणांच्या मिरवणुकीत तेही सामील होतात. अशारीतीने हिंदु-मुसलमानांच्या एकीचे सुंदर दृश्य दिसत असते. बाबांचे कान टोचलेले होते, हे मी बघितलेले आहे व स्नानाच्या वेळी त्यांना पाहिले तेव्हा त्यांची सुंता झाली नव्हती हे कळले.

मेघा बाबांना शिवस्वरुप मानून त्यांची पूजा करीत असे. एका पायावर उभा राहून त्यांची आरती करीत असे. बाबांनी त्याच्या स्वप्नात जाऊन वाड्याच्या भिंतीवर त्रिशूळ काढण्याची त्याला आज्ञा केली. मेघाने त्याप्रमाणे केले. त्यानंतर एक शिवलिंगही बाबांनी त्याला दिले. त्याची पूजा मेघा नित्य करीत असे. एकदा मेघाला बाबांना गंगास्नान घालण्याची तीव्र इच्छा झाली म्हणून कोपरगावी जावून त्याने गोदावरीचे घागरभर पाणी आणले. बाबा त्याला म्हणाले, "सर्वात शिर श्रेष्ठ असते म्हणून डोक्यावर थोडे पाणी शिंपड." पण मेघाने सबंध घागर बाबांच्या डोक्यावर ओतली. तरीही बाबांचे फक्त डोकेच ओले झाले, खाली वस्त्रे कोरडी ठणठणीत होती. हा प्रसंग मेघाने मला सांगितला.

मी बाबांना एक-दोन वेळा गाताना ऐकले आहे. ते लोकांनी गायलेली गीते व भजने आवडीने ऐकत असत. साठेवाड्यात बापूसाहेब जोग एकनाथी भागवत वाचीत असत. कधीकधी बाबा आम्हाला एकदम पोथीसाठी वाड्यात जा असे सांगत. तेथे गेल्यावर बाबा जे बोलत असत तोच भाग पोथीतही निघत असे.

बाबा पहाटे उठून धुनीकडे तोंड करून (दक्षिणेकडे) खांबाला टेकून बसत. तेव्हा काय क्रिया करीत ते कळत नसे. भक्तांना तेथे पन्नास फुटांवरही जाण्याची मनाई असे. सेवेकरी आपापले काम उदा. झाडलोट, धुनीसाठी सर्पण आणणे वगैरे कामे करीत असत. 'यादे हक' असे व इतर शब्द बाबा उच्चारित, पण आम्ही लांब उभे असल्याने स्पष्ट ऐकू येत नसे. 'अल्ला मालिक है, अल्ला वली है' वगैरे ते नेहमी म्हणत.

मी एकदा आईची परवानगी व ऑफिसातून रजा घेवून दुसऱ्या दिवशी शिरडीस निघणार होतो, पण रात्रीच बाबांनी स्वप्नात येऊन "तू येऊ नको", असे सांगितले. याचे कारण मला कळेना, पण मी निघण्याच्या दुसऱ्या दिवसापासून संप सुरू होणार होता. ठरल्याप्रमाणे मी आदल्या संध्याकाळी निघालो असतो तर माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना माझा संशय आला असता की संपास चिथावणी मीच देवून निघून गेलो. यातून बाबांनी मला वाचविले.

रघुनाथ मुकुंद इंजिनियरचे नातू यशवंतराव माझ्याबरोबर १९११-१२च्या सुमारास शिरडीस आले. त्यावेळी गुरुपौर्णिमा उत्सव व्हायचा होता. शिरडीत कॉलऱ्याची साथ जोरात चालू होती. यशवंतराव माझ्याबरोबरच मुंबईस परत जाऊ, असे म्हणत होते. पण बाबांनी पहिल्या दिवशीच त्यांना उदी देवून निरोप दिला. बाबांनी निघण्यास परवानगी दिली आहे, तुम्ही निघा,

असे मी त्यांना सांगितले. त्यांनी ते ऐकले नाही. त्याच रात्री त्यांना कॉलरा झाला व दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांचे निधन झाले.

मेघाचा अंत:काळ निकट आल्यावर बाबा त्याच्याकडे गेले आणि त्याने देह ठेवल्यावर बाबांनी अश्रू ढाळले. स्मशानात जावून त्याच्या देहावर फुले वाहिली. मृत्यूपूर्वी २/३ दिवसच मेघा आजारी होता. बाबा त्याला उदी देत होते.

एके दिवशी सायंकाळी साडेचार वाजून गेले तरी बाबांनी आम्हाला निरोप दिला नाही. मनमाडची गाडी त्यावेळी ६-३० वाजता सुटत असे. त्यादिवशी सोमवार असल्याने तो बाजाराचा दिवस होता. मी एक बैलगाडी मागविली. बाबांनी रेगे यांना माझ्याबरोबर जायला सांगितले. आम्ही नदीवर आलो तेव्हा ६-४५ झाले होते. ७-४५ला आम्ही कोपरगाव स्टेशनवर पोहोचलो. नेहमीची गाडी वेळेवर निघून गेली होती, पण त्यादिवशी ८-१५ वाजता एक खास गाडी आली व त्या गाडीने आम्ही मनमाडला गेलो. त्यावेळी मनमाडला जाण्यास ६-३० नंतर गाडी नसे.

मी शिरडीस प्रथम गेलो तेव्हा बाबांनी मला "शाळेत जा", असे सांगितले. शाळा म्हणजे राधाकृष्णमाईंचे घर, असे दीक्षितांनी नंतर मला सांगितले. त्याप्रमाणे मी तिकडे गेलो. दार बंद होते. माईंनी आतूनच "कोण आहे?" असे विचारले. मी माझे नाव सांगून मला बाबांनी पाठविले आहे, असे म्हणालो. तरीही माईंनी मला आत घेतले नाही. दहा मिनिटे थांबून मी पुन्हा मशिदीत गेलो. "शाळेत गेलास का?" असे बाबांनी विचारले. मी म्हणालो की दार बंद असून मला बाहेरच ताटकळत ठेवले. त्यावर बाबा म्हणाले, "पुन्हा जा". यावेळी मात्र माईंनी दार उघडले व माझे पाय घट्ट धरून त्या रडू लागल्या. माईंचा स्वभाव माहीत नसल्याने मी फार गोंधळून गेलो, पण त्या दिवसापासून त्यांच्या निधनापर्यंत माईंनी माझ्यावर पुत्रवत प्रेम केले. त्याच माझे सर्वस्व होत्या. त्यांच्या सूचनेप्रमाणे मी प्रत्येक क्षण बाबांच्या सेवेत घालवित असे. बाबांच्या सेवेसाठी त्यांच्या घरात, मशिदीत किंवा इतरत्रही मी दिवसभर कामातच व्यग्र असे. माई हे एक अपूर्व व्यक्तिमत्त्व होते. तन्मयतेने व भावमधुर आवाजाने त्या गात असत. मधेच त्या एकाएकी हसू लागत किंवा अश्रू ढाळत. त्या हुंदक्यांनी त्यांचे गाणे थांबत असे.

पुष्कळदा माझी रजा संपल्यावरही बाबा मला शिरडीत ठेवून घेत असत. सन १९१२ मध्ये अशाच प्रकारे मला त्यांनी ठेवून घेतले तेव्हा माधवराव देशपांडे बाबांना म्हणाले, "बाबा, त्यांना जाऊ द्या ना! नाहीतर त्यांचे साहेब त्यांना शिक्षा करतील." त्यावर बाबा म्हणाले, "त्याचा साहेब मी आहे." एकदा असे बरेच दिवस रजेशिवाय राहिलो व एके दिवशी दुपारी १ वाजता ऑफिसात गेलो. माझा खातेप्रमुख माझ्याकडे येवून म्हणाला, "तुम्ही बेकायदेशीररीत्या गैरहजर राहिल्याने तुमचा साहेबांकडे रिपोर्ट केला आहे." मी ताबडतोब माझा राजीनामा त्यांच्या हाती दिला. माझे अधिकारी श्री. विल्सन यांनी मला बोलावून घेतले व मी कोठे गेलो होतो, असे विचारले. मी इतके दिवस शिरडीत होतो, असे सांगितले. त्यांना हे सर्व माहीत होते म्हणून त्यांनी माझा राजीनामा फाडून टाकला. त्यामुळे खातेप्रमुख नाराज झाला, पण त्याची हिंमत चालेना. साहेब म्हणाले, "हा पुरंदरे तुझ्या हाताखालचा नोकर नाही." सहा महिन्यातच मला बढती मिळून त्या खातेप्रमुखाच्या जागेवर माझी नेमणूक झाली.

## साईछाया

श्रीक्षेत्र शिर्डी असे पवित्र
सद्‌गुरु श्रीसाई तेथे महंत
दर गुरुवारी श्रींची पालखी
गुरुस्थानी असे वर्दळ सारखी
रुसणार न कधी ते भक्तांवर
साईंचे अतूट प्रेम राहो मजवर
ईश्वर ते तर सर्व भक्तांचे
नाथांच्या दर्शने जळती पापे
थकलेल्यांच्या पदरी पुण्याची मापे
महाराजांचे प्रेम चिरंतन मनात
हार शोभतो नित्य त्यांच्या गळ्यात
रामनवमी, गुरुपौर्णिमा, विजयादशमी
जनांसाठी ती असे पर्वणी
माझ्यावर राहो श्री साईंची छाया सदा
झेप घेईन मी साईचरणी अनेकदा
दैवी विभूतीचे दर्शन शिर्डीमंदिरात
वन्दन श्रींना गुरुस्थानात आमचे
तसेच वन्दन द्वारकामाईत सदानंदाचे

—श्री. सदानंद वाईरकर
बोरीवली (प.), मुंबई.

## बाबा असता मागे-पुढे मग भय ते कसले

एके दिवशी मी एक वाईट बातमी ऐकली व विनाकारण मला एक अनामिक भय वाटू लागले. त्या बातमीचा विचार करून मी इतकी घाबरले की मला वेडबिड लागते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. अशा परिस्थितीत माझे मन साईनामानेच मला बरे वाटेल अशी ग्वाही देत होते. म्हणून मी श्री साईंचे नामस्मरण करीत राहिले. शेवटी मनांत एक विचार आला. खरं तर तो बाबांनीच सुचविला असे म्हणावयास हवे. आमच्या घरात बाबांचा फोटो आहे. त्यावर आम्ही जे रोज पुष्प वाहत असू ते संध्याकाळी खाली पडत असे, हे मी रोज पहात होते. ते पुष्प उचलून त्याचा वास मी घेत असे व डोक्यावरून फिरवून मग ते निर्माल्यात टाकत असे. त्यानंतर मी अंगारा लावत असे. बाबांच्या फोटोसमोर उभे राहून मी म्हटले की येथे सासरी तुम्हीच माझे मायबाप आहात. माझे दुःख तुम्ही जाणताच. तुम्हाला वाहिलेले पुष्प मी प्रसाद मानते आहे. पुढे २१ दिवसांच्या आत मला साफ बरे वाटले. माझे भय कुठल्या कुठे पळून गेले.

—सौ. सी. रीना
वास्को, गोवा.

## ज्याच्या पाठी साई जगी त्यास भय नाही

मी बँकेत नोकरीला आहे. शनिवार, दिनांक २४-३-१९९० रोजी मला बँकेतून चेक घेवून चर्चगेटला पाठविण्यात आले. चेक पिशवीत घालून मी बँकेतून बाहेर पडलो. बांद्रा स्टेशनला येवून पिशवीत पाहिले तो चेक नाहीत. माझ्या हातून ३०५४०० रुपयांचे चेक हरविल्याचे पाहून मी अत्यंत घाबरलो. आता नोकरीवरून काढून टाकणार या भयाने माझे हात-पाय कापू लागले. माझ्या गळ्यात साईंचा फोटो आहे. तो हातात घेवून मी रडत रडत साईंचा धावा सुरू केला. ज्या रस्त्याने आलो होतो त्या रस्त्याने परत गेलो तेव्हा मला ते चेक रस्त्यात पडलेले सापडले. ज्याच्या पाठी साई। जगी त्यास भय नाही याचा अनुभव मला आला.

—श्री. भास्कर राऊत
भाईंदर (पूर्व), ठाणे.

## बाबांच्या कृपेने अशक्य ते शक्य झाले

आम्ही पूर्वी डोंबिवलीत राहत होतो. तेथील जागा सोडून ठाण्याला जायचा विचार होता, पण आर्थिक परिस्थिती जेमतेम असल्याने साईबाबांवरच भार टाकून ठाण्यात जागा बघावयास सुरुवात केली. बाबांच्या कृपेने ठाण्यात मनाजोगी जागा मिळाली व डोंबिवलीच्या जागेलाही चांगले गिऱ्हाईक मिळाले.

आम्ही ठाण्याच्या ब्लॉकचे रजिस्ट्रेशन केले, पण स्टॅम्प-ड्युटी जवळजवळ ३०,००० रुपये होती. परंतु त्याचवेळेस स्टॅम्प-ड्युटी कमी झाल्याची बातमी पेपरमध्ये आली व आमचे काम फक्त सहा हजार रुपयांत झाले. ही सर्व श्री साईबाबांची कृपा. माझ्या मुलाला ठाण्याच्या चांगल्या शाळेत प्रवेश मिळाला. अशी अनेक अशक्य कामे साईबाबांच्या कृपेने पार पडतात.

—श्री. अरुण शिंदे
ठाणे (पूर्व).

## माय-माऊली

माझ्या तीन नंबरच्या मुलीचे लग्न जुळत नव्हते व तिच्या मागच्या मुलाच्याही लग्नाचा घोळ चालला होता. बहिणीचे लग्न झाल्याशिवाय आपल्याला लग्न करायचे नाही असा मुलाचा निश्चय होता. त्यानंतर मुलीचे लग्न यथासांग पार पडले. त्यावर दोन वर्षे उलटली तरी मुलाचे लग्न जमत नव्हते. माझा मुलगा पदवीधर असून दिसायला चांगला, निर्व्यसनी, सद्‌गुणी, नामवंत कंपनीत चांगला पगारदार, स्वतःचा फ्लॅट, पण लग्न जुळत नव्हते. सर्व काही जमते तर देवीचा कौल होत नाही असे काही विपरित घडत होते. एक ना अनेक अडचणी यायच्या आणि यातच दोन वर्षे उलटली.

शेवटी मी त्याच्या लग्नाचं साकडं श्री साईबाबांना घातलं, श्री साईसत्‌चरितातील १५वा अध्याय वाचायला सुरुवात केली आणि काय आश्चर्य! अध्यायाचे वाचन संपता संपता ध्यानी-मनी नसताना एक गृहस्थ आमचा पत्ता शोधत आले व मुलगी पाहाण्याचा आग्रह करू लागले. पत्रिका पाहिली. ती जुळली. मुलगी सुस्वभावी, सालस, पदवीधर, चांगल्या घराण्यातील मिळाली. सर्व नातेवाईकांचे सहकार्य लाभून लग्न आठ दिवसांत ठरले व कुठल्याही प्रकारचे विघ्न न येता लग्न पार पडले. आज ती दोघेही सुखात नांदत आहेत. दुसरी मुलगीच सुनेच्या रुपाने मिळाल्यासारखे वाटते. ती सर्वांचे आत्मियतेने सर्व काही करते. हे सारं काही सुव्यवस्थित पार पाडण्यात श्री साईबाबांचाच हात आहे व त्यांचंच हे देणं आहे असे मी मानते.

—सौ. सुमित्रा धुरी
पिंपरी, पुणे.

# सबुरी

आम्ही सर्व सात भावंडे व आई-वडील एवढे आमचे कुटुंब. मीच सर्वात मोठा. गेली काही वर्षे घरी तसेच ऑफिसमध्ये माझ्या लग्नाची सतत चर्चा चालू होती. दर आठ दिवसांनी कोठे ना कोठे मुलगी पाहाण्याचा कार्यक्रम व्हायचा, पण लग्न काही ठरत नव्हते. त्याचवेळी मला शिरडीला जाऊन यावेसे वाटू लागले.

दिनांक १-५-१९८९ रोजी म्हणजेच महाराष्ट्र दिनी पहाटे पाच वाजता धोतर नेसलेल्या, अंगात सदरा घातलेल्या, डोक्याला फेटा गुंडाळलेल्या एका अपरिचित व्यक्तीने दरवाजावर थाप मारली. दरवाजा मीच उघडला. मुंबई-शिरडी आरामगाडीचे तिकीट देत ती व्यक्ती म्हणाली, "चव्हाण, तुम्हाला शिरडीला जावयाचे आहे ना! हे घ्या तिकीट". मी पैसे देऊ लागलो तर ती व्यक्ती लघुशंका करून येतो असे हाताच्या करंगळीने दर्शवून तिकीट माझ्या बनियनमध्ये कोंबून निघून गेली. सकाळी सहा वाजता आई उठली. तिने आपल्या स्वप्नात साईबाबा येऊन माझ्याबाबतीत घडलेला प्रसंग तिला स्वप्नात दिसला हे मी तो प्रकार न सांगताच मला सांगितला.

त्या तिकिटावर मी शिरडीला जाऊन आलो. साईबाबांचे दर्शन घेऊन घरी परतलो. येताना साईनाथांची एक तसबीर आणली. घरात पाऊल ठेवले तर काय आश्चर्य! एका मुलीचे वडील आमच्या घरी आले होते. मुलगी पाहाण्याचा कार्यक्रम झाला व काही दिवसांतच माझा विवाह थाटामाटात पार पडला.

साईबाबांच्या चरणी जो ज्या भावनेने नतमस्तक होतो त्यापेक्षा कितीतरी अधिक त्याला मिळाल्याशिवाय राहात नाही. म्हणूनच म्हणावेसे वाटते–

**जया मनी जैसा भाव।**
**तया तैसा अनुभव॥**

–श्री. प्रल्हाद चव्हाण
तारापूर.

---

# आषाढी एकादशीला बाबांचा प्रसाद

"श्री साईलीला"चा सभासद झाल्यापासून वर्षभरातील सर्व अंक मी वर्षाअखेर एकत्र करून बाईंडिंग करून ठेवतो. १९८८च्या मार्च महिन्याचा अंक मला मिळाला नाही. "श्री साईलीला"च्या कार्यालयात चौकशी करता पोष्टाने तो पाठवून दिल्याचे कळले, पण मला काही तो मिळाला नाही. या एका अंकामुळे वर्षाअखेरचे एकत्र बाईंडिंग मी करू शकत नव्हतो व त्यामुळे बेचैन झालो होतो.

साईबाबा आपल्या भक्तांच्या इच्छा कोणत्याही प्रकारे पुऱ्या करतात याचा अनुभव मला याप्रसंगी आला. आमचे घरमालक व माझे स्नेही श्री. सुनिल पाथरे हे आषाढी एकादशी निमित्त शिरडीला गेले होते. शिरडी येथील वास्तव्यात तेथील कार्यालयीन सेवकाने त्यांना "साईप्रसाद" म्हणून "श्री साईलीला"चे दोन अंक भेट दिले. त्यात एक होता १९८७चा इंग्रजी अंक व दुसरा होता १९८८चा मार्च महिन्याचा मराठी अंक. माझे स्नेही त्यानंतर रत्नागिरीला गेले व तेथून आल्यावर बाबांची उदी व वरील दोन अंक माझ्याकडे देऊन त्यांनी ते अंक तुम्हीच ठेवा असे सांगितले. माझ्याकडे नसलेला मार्च महिन्याचा अंक आषाढी एकादशीला बाबांनीच मला शिरडीहून पाठविला. माझे डोळे बाबांच्या या चमत्काराने दिपून गेले. मी त्या अंकावर "साईप्रसाद" असे लिहून तो अंक इतर अंकांसोबत बाईंडिंग करून ठेवला आहे.

–श्री. शरदचंद्र शेरे
रत्नागिरी.

---

# ....आणि मला चांदभाईच्या अनुभवाची आठवण झाली

आमचा टाटा मर्सिडीझ मालट्रक क्रमांक एम्.टी.ओ. ६९७९ २२ नोव्हेंबर १९८८ रोजी मुंबई-रोडवरील काणेफाटा येथून रात्री १० वाजून ३० मिनिटांनी चोरीस गेला. त्यात तेरा लाखाची मशिनरी होती व गाडीची किंमत साडेतीन लाख. आमचे घरदार उघडे पडायची पाळी आली होती.

आमचे घर १९५८ सालापासून साईचरणी लीन झालेले आहे. आमच्या गाड्या वर्षातून एकदा शिरडीला बाबांच्या दर्शनाला जाऊन येतात. पंधरा दिवस आम्हाला अन्नपाणी गोड लागत नव्हते. गाडी सापडली तरी ती संपूर्ण तंदुरुस्त अवस्थेत सापडेल याची खात्री नव्हती.

पुणे येथे स्वारगेटजवळील श्री साईकृपा मठात आमचे गुरुबंधु श्री. शशिकांत लोंबर व मी अशा दोघांनी दुपारच्या आरतीच्या वेळी बाबांना साकडे घातले व म्हणालो, "बाबा, चांदभाईची हरवलेली घोडी तुम्ही शोधून दिली, मग आमचीच उपेक्षा का?" बाबांनी योगसामर्थ्याने अशी काही सूत्रे चालवली की गुरुवार, दिनांक ८ डिसेंबर १९८८ रोजी गाडी चाळीसगाव येथे सापडली. त्याचे असे झाले: चोरून गाडी नेत असताना चाळीसगाव येथील पोलिसचौकीच्या समोर गाडीची क्लचप्लेट स्लीप झाली. आपण आता येथे गाडीदुरुस्तीच्या नादी लागलो तर

आयते पोलिसांच्या हाती सापडू म्हणून चोर पळून गेले. नंतर पोलिसांनी गाडीवरील फोननंबर पाहून आम्हाला पुण्याला फोन केला व आम्ही तिथे गेल्यावर योग्य ती चौकशी करून गाडी आमच्या ताब्यात दिली. अशी आहे बाबांची भक्तवत्सलता.

–श्री. हरिभाऊ जरांडे
सदाशिव पेठ, पुणे.

## जेथे जातो तेथे तू माझा सांगाती

आमच्या महाविद्यालयातील आम्ही बारा मित्रांनी शिरडी-दर्शन आटोपून संध्याकाळी पाच वाजता नाशिकमध्ये पदार्पण केले. पंचवटी, त्र्यंबकेश्वर आदी तीर्थक्षेत्रांना दुसऱ्या दिवशी भेट देण्याचे ठरविले. नाशिकमध्ये मुक्तिधाममध्ये खोली मिळावी म्हणून खूप खटपट केली, पण आमच्याबरोबर कोणीही स्त्री किंवा मुलगी नसल्यामुळे मुक्तिधाममधील जागा नियमाप्रमाणे तेथील कर्मचाऱ्यांनी आम्हाला देण्याचे साफ नाकारले. खोली मिळाली नसती तर त्या संध्याकाळी आम्हाला मुंबईला परतणे भाग होते. साईबाबांना आम्ही साकडे घातले व तूच या प्रसंगातून मार्ग काढ अशी त्यांना प्रार्थना केली.

आणि काय चमत्कार! माझा एक मुंबईचा जवळचा मित्र व त्याची बहीण समोरून येताना आम्हाला दिसली. आम्ही आमची अडचण त्यांना सांगितली. कुळकर्णींची बहीण आमच्याबरोबर मुक्तिधामच्या ऑफिसमध्ये येऊन आम्हाला त्या दिवशी खोली मिळाली व दुसऱ्या दिवशी पंचवटी, त्र्यंबकेश्वर इत्यादी स्थळे पाहाण्याचा आमचा मानस पूर्ण झाला. या प्रसंगामुळे खात्री झाली की घारीचे जरी आकाशात कुठेही भ्रमण चालू असले तरी घरट्यातील आपल्या पिलांकडे तिचे अचूक लक्ष असते तसे आम्ही बाबांचे भक्त बाबांपासून कितीही दूर असलो तरी बाबांचे आपल्या भक्तांवर सतत लक्ष असते. **'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती'** या वचनाचा बाबांच्या भक्तांना सतत प्रत्यय येत असतो.

**–श्री. प्रदीप जोशी**
वडाळा (पूर्व), मुंबई.

## कल्पनातीत अनुभव

मी रहात असलेले घर व ऑफिस यामधील अंतर सुमारे आठ किलोमीटरचे आहे. रस्ता खराब असल्यामुळे मला माझ्या मोटरसायकलने फार जपून जावे लागते. ४ ऑक्टोबर १९८९ रोजी घडलेली ही गोष्ट. जवळजवळ आठ किलोमीटरचा प्रवास पूर्ण केल्यावर हमरस्त्यावर अचानक एक कुत्रे माझ्या गाडीला आडवे आले व त्यामुळे भांबावलेल्या अवस्थेत माझ्या गाडीने कुत्र्यास धडक दिली व माझा तोल जाऊन मी डांबरी रस्त्यावर आपटला गेलो. भर रहदारीच्या रस्त्यावर अचानक पडल्यामुळे मागून येणाऱ्या कोणत्याही गाडीखाली मी सापडलो असतो. तसेच खाली पडल्यानंतर माझ्या डोक्यावर हेल्मेट नसल्यामुळे वर्मी मार लागू शकला असता. परंतु सद्गुरु साईनाथांच्या कृपेने मी या विकट प्रसंगातून वाचलो. उजव्या पायास व डाव्या हातास मुका मार बसला. पायाच्या वेदना तीव्र होत्या.

गेली सतत दहा वर्षे विजयादशमीच्या दिवशी मी बाबांच्या पुण्यतिथी सोहळ्यास आवर्जून शिरडीला जात असतो. पाच-सहा दिवसांवर विजयादशमी असल्यामुळे यावेळी जायला मिळते की नाही या विवंचनेत मी होतो. आठ ऑक्टोबरला कोल्हापूरहून शिरडीस जायला निघालो. शिरडीत आल्यावर पायाच्या वेदना कमी झाल्या. बाबांची उदी पायाला चोळल्यावर बरे वाटायला लागले व आम्हाला मिळालेल्या खोलीत जाण्यासाठी इमारतीच्या पायऱ्या चढायला लागलो, तर काय आश्चर्य! माझे दुखणे थांबले होते.

**–श्री. सतीश माने**
कोल्हापूर.

## ही सारी बाबांची कृपा!

श्री. रामचंद्र बोडके यांची व माझी सहजच अशी भेट झाली. ते ४० वर्षांपेक्षा अधिक काळ साईबाबांचे परम भक्त आहेत. त्यामुळे मला त्यांच्याशी बोलण्याची जिज्ञासा निर्माण झाली. मी त्यांना म्हणाले, "इतकी वर्षे बाबांच्या सेवेत, भक्तीत आपण घालविलीत, तर आपणाला बाबांसंबंधी बरेच अनुभव आले असतील. त्यातील एखादा आपण आम्हाला सांगितलात तर आम्हाला खूप आनंद होईल. आपण श्री क्षेत्र शिरडी येथे मोठ्या श्रद्धेने राहिलात. नित्य दर्शन, पूजा, आरती, प्रसाद हे सारे काही आपणाला प्राप्त झाले. आपण भाग्यवान आहात. पुण्यवान आहात. आपल्या आनंदात आम्हा पामरांनाही सहभागी करावे."

श्री. रामचंद्र म्हणतात, "बाबांच्याच कृपेने मी आज आपणाशी बोलत आहे. त्यांची कृपा मला अनेक संकटांना तोंड देण्यास सहाय्यभुत झाली. म्हणूनच मी अनेक अडचणींवर मात करू शकलो. माझ्यावर अनेक संकटे कोसळली. तरीही बाबांचे अखंड स्मरण अंतरात चालूच असे. पूजा-पाठ, भजन, संकीर्तन, आरती, धुपारती कधी चुकवायची नाही आणि त्याशिवाय

अन्न ग्रहण करावयाचे नाही हा माझा त्यावेळचा नेम आजही चालू आहे. किती म्हणून अनुभव सांगावेत! सारे सांगत बसलो तर वेळ पुरणार नाही. लिहायचे झाले तर गाथा होईल भली थोरली. शिरडीच्या वाऱ्या अखंड केल्या. अद्याप चालू आहेत. सांप्रत मी पुण्यात अरण्येश्वराच्या नजिक राहतो. यापूर्वी पुण्यातील बुधवार पेठेत मी रहात असे. माझी स्थिती माझे लग्न होण्याजोगी नव्हती, पण बाबांच्या कृपेने लग्न झाले. माझ्या विचारांशी सहमत असणारी सहधर्मचारिणी मला मिळाली. आजतागायत बाबांच्या कृपेने माझा प्रपंच छान झाला आहे. आम्हाला अपत्यलाभ उशिराने झाला. अपत्य होते की नाही अशी शंका माझ्या आप्तांना येऊ लागली. माझ्या मनात दुसरा विवाह करण्याचेही भरविले जाऊ लागले. मी कोणाचे मन दुखविले नाही, पण बाबांच्या मूर्तीसमोर बसून मात्र त्यांना सारे सांगत असे. बाबा, तुम्ही माझ्यावर कृपा करा. ही भोवतालची मंडळी माझे डोके फार खातात. तुम्ही योग्य तेच करणार ही मला खात्री आहे, अशी विनवणी करीत असे. त्यातच पहिले मूल मला झाले व महिन्याचे होते न होते तोच जबरदस्त व्याधीने त्याला ग्रासले. त्याच्या जीविताची खात्री उरली नाही. अखेर ते मूल मी बाबांच्या चरणाशी ठेवले आणि बाबांची प्रार्थना केली की हे आपल्या कृपेचे फळ आहे. त्याला तारायचे की मारायचे ते तुम्हीच ठरवा. आपले चरण सोडून मी कोठेच जाऊ शकत नाही. कितीतरी वेळ मी बाबांचे पाय घट्ट धरून ठेवले होते याचे माझे मलाच भान राहिले नव्हते आणि बाबांचा अद्भुत चमत्कार काय वर्णावा! मुलाचा आजार कुठच्या कुठे पळून गेला. असे आहे बाबांचे माहात्म्य. वर्णावे तेवढे थोडेच."

–डॉ. सीता कुलकर्णी
शुक्रवार पेठ, पुणे.

## नित्य घ्या प्रचीत अनुभवे

मी व माझे कुटुंब एप्रिल १९८६ मध्ये दोन दिवस शिरडीला बाबांच्या दर्शनाला जाऊन आलो. रात्रीचा प्रवास व जागरण यामुळे दुसऱ्या दिवशी मी ऑफिसला गेलो नव्हतो. त्याच दिवशी दुपारी दोन वाजता न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेतून मला पत्र आले. त्यात लिहिले होते की मी ज्याला जामीन राहिलो होतो त्याने आपल्या कर्जाचे हप्ते वेळेवर न भरल्यामुळे माझ्या पगारातून दरमहा ७०० रुपये कापून पाहिजेत व त्यासाठी मी तयार असावे. १९७९ मध्ये मी व आमच्या सोसायटीचा सेक्रेटरी असे आम्ही दोघेजण कर्ज घेणाऱ्याला जामीन राहिलो होतो. त्या व्यक्तीचे दुकान आहे. त्याच्या दुकानावर जप्ती न आणता कर्जाचे हप्ते आमच्याकडून वसूल करण्याचे बँकेने ठरविले होते.

मी बाबांना साकडे घातले की बाबा, आजच मी आपले दर्शन घेऊन आलो व हे संकट माझ्यापुढे उभे राहिले. आता तुम्हीच यातून मला सोडवा. रात्रंदिवस हे मी बाबांना सांगत होतो. त्याचबरोबर कर्ज घेणाऱ्याच्या मागेही लागलो होतो. तीन-चार दिवसांनंतर कर्ज घेणारी व्यक्ती माझ्याबरोबर बँकेत आली. त्याने आठ हजार रुपये भरले व प्रत्येक महिन्याला पाच हजार रुपये हप्ता भरेन असे लिहून दिले. बँकेच्या मॅनेजरने मला माझ्या कंपनीत द्यायला एक पत्र दिले. ते मिळाले नसते तर दर महिना सातशे रुपये माझ्या पगारातून कापले गेले असते. अशा रीतीने बाबांनी मला या संकटातून वाचविले.

–श्री. श्रीधर महाडिक
गोरेगाव (प.), मुंबई.

## मागे-पुढे उभा माझा साईनाथ

मे १९८७ मध्ये माझ्या मुलाचे लग्न झाले. अहेरामध्ये साईंचा फोटो असलेले एक घड्याळ मिळाले. लग्नानंतर पंधरा-वीस दिवसांनी बाबांनी स्वप्नात दृष्टांत देऊन कोपऱ्यात पडलेल्या त्या घड्याळाची आठवण करून दिली. परंतु नवीन विचारसरणीच्या जोडप्याने व माझ्या यजमानांनी त्याकडे दुर्लक्ष केले आणि मीही विसरून गेले. माझ्या मुलाच्या लग्नाला दोन महिने झाले असतील नसतील तोच माझी नोकरी करणारी सून कामावर जात असताना सकाळी साडेसहाच्या सुमाराला टॅक्सीने ठोकर दिल्याने तिला हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले. हॉस्पिटलमधून घरी आल्यानंतर तिला उठता-बसता येत नसल्यामुळे डॉक्टरने कमरपट्टा लावावा लागणार असे सांगितले. हे ऐकून मी बाबांच्या फोटोपुढे जाऊन नतमस्तक झाले व त्यांना प्रार्थना केली की माझ्या सुनेला पट्टा लागणार नाही असे कर. ती पूर्ववत हिंडू-फिरू लागू दे. तिला अशा तऱ्हेने लवकर बरे वाटल्यास एका महिन्याच्या आत माझा मुलगा व सून तुझ्या दर्शनासाठी शिरडीला येतील. थोड्या दिवसातच सून पूर्णपणे बरी झाली. मी सांगितल्याप्रमाणे मुलगा व सून शिरडीला जाऊन आली. साईनाथ भक्तांच्या मागे-पुढे सदैव उभे असतात याची खात्री झाली.

– सौ. सुशिला पाटील
अंधेरी (पूर्व), मुंबई.

## साई म्हणे तोचि, तोचि झाला धन्य झाला जो अनन्य माझ्या पायी

**जरी हें शरीर गेलों मी टाकून। तरी मी धावेन भक्तांसाठीं॥** या बाबांच्या अतिसुंदर वचनाचा आम्हाला अनुभव

आला. माझा मुलगा अमीत तापाने आजारी होता. डॉक्टरांच्या औषधाने त्याला तात्पुरते बरे वाटायचे, पण ताप पुन्हा चढायचा. माझी आई घाटकोपरला रहाते. त्यांच्या डॉक्टरकडे गेलो तर त्यांनी घाटकोपरच्या हॉस्पिटलमध्ये त्याला दाखल करायला सांगितले. तिथेसुद्धा तिच परिस्थिती. आमचा बाबांवर विश्वास. आम्ही त्यांचाच धावा सुरू केला.

मी व माझी आई मुलाजवळ बसलो असता त्याला काही मिनिटे झोप लागली. झोपेत तो जीभ व ओठ हलवू लागला. त्याला जाग आल्यावर त्याविषयी विचारले असता तो म्हणाला की त्याला प्रथम धूर दिसला व त्यात साईबाबांची तेजस्वी मूर्ती दिसली. साईंनी त्याच्या डोक्यावरून हात फिरविला व द्वारकामाईत नेऊन आपल्या मांडीवर झोपविले. धुनीतून उदी घेऊन थोडी त्याच्या कपाळाला लावली व थोडी जीभेवर ठेवली. त्यामुळेच त्याचे ओठ हलत होते.

रात्री माझे पती हॉस्पिटलमध्ये आले असता व त्यांना विचारले असता ते म्हणाले की आईच्या घरी जी बाबांची मूर्ती आहे तिचे पाय धरून मी बाबांना माझ्या मुलाला दर्शन द्या व त्याला बरे करा असे सांगितले. माझ्या मुलाला पडलेल्या स्वप्नाची वेळ व माझ्या पतीने बाबांना घातलेल्या हाकेची वेळ एकच होती.

**– सौ. सुनीती सावंत**
बोरीवली (पूर्व), मुंबई.

---

## साई तारी त्याला कोण मारी

मी, माझे पती, माझ्या दोन मुली व शेजारचे एक कुटुंब दिवाळीच्या खरेदीसाठी ठाण्याला गेलो होतो. संध्याकाळी सहाच्या दरम्यान ठाण्याहून घरी परतत असताना आमच्या जीपला एका बसने धडक दिली. दोन्ही वाहने तशी वेगातच होती. आमची जीप रस्त्याच्या कडेला गवतात पडली. मी मोठ्याने साईबाबा वाचव अशी ओरडले. जीपच्या मागच्या भागाची बरीच मोडतोड झाली. माझ्याशिवाय कुणालाच विशेष इजा झाली नाही. माझ्या उजव्या हाताला काचा लागून पाच टाके पडले. १५ ऑक्टोबर म्हणजे बाबांच्या महानिर्वाणाचा दिवस. याच दिवशी बाबांनी आम्हाला पुनर्जन्म दिला.

**– सौ. अरुंधती सदावर्ते**
सूर्यानगर.

---

## हाकेला साई धावूनी येती

श्री साईनाथ आपल्या भक्तांच्या लहानमोठ्या अडचणींमध्ये त्यांच्या मदतीला कसे धावून जातात त्याचा अनुभव साईभक्तांना नेहमी येत असतो. असाच मला आलेला एक अनुभव मी येथे देत आहे.

दिवाळीचे दिवस होते. घरात मुले, सुना, नातवंडे यांची गडबड होती. त्यातच एके दिवशी माझा घसा बसला. शब्द बोलता येईना. घरगुती उपाय केले, पण सुधारणा नव्हती. माझा धाकटा मुलगा आपल्या डॉक्टरमित्राकडे घेऊन गेला. त्याने सांगितले की महिनाभर घसा दुखतोय तर घशाच्या स्पेशालिस्ट डॉक्टरला दाखविलेले बरे.

माझी सून मला इ.एन्.टी. डॉक्टरकडे घेऊन गेली. त्याने औषधे दिली. आठ दिवसांनी पुन्हा तपासण्यासाठी या म्हणून सांगितले. आठ दिवसांनी दुसरी औषधे दिली. ह्या औषधांनी जर बरे वाटले नाही तर भूल देऊन घसा तपासून काय झाले ते पहावे लागेल असे सांगितले. असे सांगितल्यावर घरचे आम्ही सर्वजण घाबरून गेलो.

मुले व सुना आपापल्या नोकरीच्या गावी गेली होती. घरी मी एकटीच होते. तोंडाने साईंचे नामस्मरण करीत होते. वर्षाला लागणाऱ्या मिरच्या एकदम घेऊन निवडत होते. मिरच्या निवडता निवडता एकदम जोराचा ठसका लागला. नाका-डोळ्यांतून खोकून खोकून पाणी येऊ लागले. आणि खोकता खोकताच माझा आवाज स्वच्छ येऊ लागला. अशा तऱ्हेने माझ्यावर आलेले डॉक्टरी उपचारांचे संकट श्री साईनाथांच्या कृपेने टळले.

**– श्रीमती सुलभा गोटखिंडीकर**
कोल्हापूर.

---

## साई पावला

दाखवू कसे कोणाला
हृदयीच्या प्रतिमेला
साई, साई सदा बोला
सद्भाव तो प्रकटला.

जपता साईनामाला
चमत्कार दाखविला
येथे साध्याही गोष्टीला
तो साई मला पावला.

नच मागणे मोठे हो
साईवचन सत्य हो
श्रद्धा-सबुरी ठेवा हो
शिर्डीपति तो येई हो.

**– श्री. बाबू डिसोजा**
खोपोली, रायगड.

---

# साईंचे परमभक्त
# कै. तात्यासाहेब नूलकर

**–ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)**



श्री साईसच्चरितात कै. तात्यासाहेब उर्फ लक्ष्मण कृष्णाजी नूलकर यांचा उल्लेख फार क्वचितच आलेला आहे. त्यांच्याविषयीच्या कथाही त्यात आढळत नाहीत. कदाचित् हेमाडपंत बाबांकडे १९१० साली गेले व त्यानंतर एकाच वर्षात तात्यासाहेबांचा देहांत झाल्याने तात्यासाहेबांचा प्रत्यक्ष सहवास त्यांना फारसा लाभला नसावा किंवा कोणाकडून तात्यासाहेबांबद्दल फारशी खात्रीची माहिती मिळाली नसावी म्हणूनही असेल. असो.

तरीपण **'साईंचे परमभक्त तात्यासाहेब नूलकर विख्यात' 'बाबांसमोर तुकविती माथा, अवर्णनीय लीनता तयांची' 'धन्य तात्यासाहेब नूलकर। अंतीं शिरडींत भजनतत्पर। जिंहीं कलेवर विसर्जिलें॥'** वगैरे ही विशेषणे त्यांच्याबाबतीत हेमाडपंतांनी वापरलेली आहेत त्यावरून त्यांनाही तात्यासाहेबांच्या अतुल भक्तीबद्दल आणि आध्यात्मिक उच्च स्थानाबद्दल थोडीतरी कल्पना होती, हे दिसते.

दैवयोगाने अलिकडेच तात्यासाहेबांचे नातू (धाकट्या मुलाचे चिरंजीव) श्री. रघुनाथ विश्वनाथ नूलकर यांच्याशी माझी भेट झाली आणि त्यांच्याकडून तात्यासाहेबांबद्दल साईभक्तांना ठाऊक नसलेली, त्यांच्या वडिलांनी प्रत्यक्ष पाहिलेली व लिहून ठेवलेली पुष्कळशी खात्रीची माहिती मला मिळाली. त्यावरून तात्यासाहेबांबद्दल हा लेख मी लिहीत आहे.

**पूर्वायुष्य व साईबाबांची प्रथम भेट**

तात्यासाहेबांचा जन्म १९व्या शतकातील उत्तरार्धातला. त्यांचे शिक्षण पुणे हायस्कूलमध्ये झाले होते. सरकारी नोकरीत व इतर व्यवहारात बाणेदारपणा, सत्यप्रियता, निःस्वार्थबुद्धी, परोपकार व मनोनिग्रह हे त्यांचे गुण प्रसिद्ध होते. त्याचप्रमाणे आध्यात्मिक विषयांचाही त्यांचा बराच अभ्यास असून उपनिषदे वगैरे वेदांत ग्रंथांचे वाचन असे. अनेक सत्पुरुषांचे दर्शन व समागम त्यांना घडला होता.

इ.स. १९०८ सालची गोष्ट. तात्यासाहेब पंढरपूर येथे सब-जज्ज होते व कै. नानासाहेब चांदोरकर तेथेच मामलतदार होते. नानासाहेब तात्यासाहेबांना शिरडीस जाण्यासाठी गळ घालीत होते. शेवटी तात्यासाहेब नानासाहेबांना म्हणाले, "मला ब्राह्मण स्वयंपाकी व बाबांना भेट देण्यासाठी चांगली नागपुरी संत्रे मिळाली तरच मी शिरडीस येईन." त्यावर नानासाहेब म्हणाले, "हो! बाबांच्या कृपेने तीही मिळतील."

त्याच रात्री नानासाहेबांकडे एक ब्राह्मण स्वयंपाकी नोकरीसाठी आला व त्यांनी लगेच त्याला तात्यासाहेबांकडे पाठवून दिला. दुसऱ्या दिवशी सकाळी तात्यासाहेबांना उत्तम नागपुरी संत्र्यांचे पार्सल मिळाले व ते कोणी पाठविले, याचा पत्ता लागला नाही. काही का असेना! तात्यासाहेबांना बाबांच्या दैवीशक्तीचा प्रत्यय आला व ते नानासाहेबांबरोबर शिरडीस गेले. तात्यासाहेब अंगाने स्थूल व ठेंगणे होते. त्यांनी बाबांना नमस्कार केल्यावर बाबांनी त्यांच्या डोक्यावर पाचही बोटांचा हात हलकाच परंतु जरा धक्का बसावा असा ठेवला. तेव्हा तात्यासाहेब जरा मागे खांबावर लडकले. पण त्याच क्षणी डोक्यात निराळाच भाव जागृत झाला व हेच आपले गुरुस्थान अशी खात्री होऊन काही क्षण ते अद्वितीय आनंदात होते.

त्या रात्री तात्यासाहेब साठ्यांच्या वाड्यात झोपेतून एकदम जागे झाले व नानासाहेबांकडून पानाचा विडा मागू लागले. नानासाहेब तो कधीच ठेवत नसत. त्याचवेळी मशिदीत बाबा कोणा एकाला म्हणाले, "हे चार विडे घे आणि चांदोरकरांबरोबर ते म्हातारे गृहस्थ आहेत त्यांना देऊन ये." या माणसाला अचानक विडे घेऊन आलेला पाहून तात्यासाहेबांना बाबांच्या

अंतर्ज्ञानाची खात्री पटली व त्यांची बाबांवर एकदम श्रद्धा बसली. ते पंढरपूरास परत आले, पण केव्हाही रजा अथवा सुट्टी मिळो, ते शिरडीला जाऊ लागले.

### डोळ्यांचे दुखणे बरे झाले

एकदा तात्यासाहेबांच्या डोळ्यांना काही भयंकर स्वरूपाचा विकार झाला. दृष्टी विकृत झाली आणि वेदना असह्य झाल्या. पुष्कळ नामांकित नेत्रवैद्यांची औषधे घेऊनही गुण न आल्यामुळे निराश होऊन शेवटचा उपाय म्हणून गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने तात्यासाहेब शिरडीला गेले. दोन दिवस डोळे बांधून तसेच बाबांचा धावा करीत पडून होते. तिसऱ्या दिवशी बाबांनी माधवरावांना हाक मारली आणि आपल्या डोळ्यांवर हात ठेवून म्हणाले, "शामा, माझा डोळा आज फार दुखतोय." बाबांच्या तोंडून हे शब्द निघाल्यापासून तात्यासाहेबांचे डोळे आपोआप बरे झाले. (श्री साईसच्चरितात अ. २१ मध्ये बाबांनी एका वकिलाला उद्देशून कोणाच्या वागण्याचा व्यर्थ उहापोह करण्याबद्दल ताशेरा झाडून त्याला कोणाची थट्टानिंदादी प्रकार न करण्याबद्दल जी शिकवण दिली, ती याच मुनसफपद भूषविणाऱ्या तात्यासाहेब नूलकरांच्या शिरडीला येऊन बाबांच्या नादी लागण्याविषयी वकिलांमध्ये झालेल्या चर्चेबद्दल होती.)

### बाबांचा अनुग्रह

पूर्वी पूर्वी श्री साईबाबांची वृत्ती फार उग्र असे. पूजादी उपचार ते कधी करून घेत नसत. कोणी हार घातल्यास तोही ते घालून घेत नसत. परंतु निरनिराळ्या भक्तांच्या प्रेमामुळे पुढे पुढे ते पूजा, आरती वगैरे उपचार करून घेऊ लागले. निरांजन वगैरे ओवाळून आरती म्हणण्याचा प्रघात प्रथम तात्यासाहेबांनीच सुरू केला. एवढेच काय गुरुपौर्णिमेला बाबांची गुरुपूजा करण्याची पद्धतही तात्यासाहेबांमुळेच सुरू झाली. बाबांचे आणि तात्यासाहेबांचे परस्परांवरचे प्रेम काही अनुपम होते. तात्यासाहेबांना साईबाबा 'तात्याबा' किंवा 'म्हातारा' या नावाने संबोधित असत. पूजेच्या वेळी अनेक नैवेद्यांची ताटे येत, पण केव्हा केव्हा 'तात्याबाची पोळी पाहिजे', असे म्हणून साईबाबांनी पोळ्यांच्या ढिगातून तात्यासाहेबांच्या घरची पोळी अचूक काढून घ्यावी, असे कित्येकदा घडत असे. बाबांच्या मुखातून आपणास काही अनुग्रहाची अक्षरे मिळावी, अशी तात्यासाहेबांच्या मनात इच्छा येताच बाबांनी काही विवक्षित नामोच्चार करून त्यांच्या मनास समाधान होईल अशा तऱ्हेने त्यांची इच्छा पूर्ण केली. याच अक्षराचे नामस्मरण तात्यासाहेब आपल्या देहांतापर्यंत करीत होते. पूजेसाठी बाबांच्या हस्ते काही तरी प्रसाद आपणास मिळावा, असे तात्यासाहेबांना वाटत असे. तेव्हा अनपेक्षित रीतीने मार्गशीर्ष मासी श्रीदत्तजयंतीच्या दिवशी रात्री सुमारे नऊ वाजता 'म्हाताऱ्याला बोलावून आण' म्हणून बाबांनी आज्ञा केली. निरोप म्हाताऱ्याला पोहोचावयाच्या आधी तोच निरोप बाबांनी एकामागून एक असे दोघांच्या हाती पाठविला. इतकी देवाला घाई झाली. तात्यासाहेब येताच जवळ असलेल्या कफन्यांच्या ढिगातून एक कफनी काढून ती तात्यासाहेबांच्या अंगात घातली व "असू दे. तुला थंडी-वाऱ्याची कामाला येईल," असे म्हटले. हा आपल्या मनासारखा संन्यासदिक्षेसारखाच अनुपम अनुग्रह पावून तात्यासाहेबांच्या डोळ्यांत प्रेमाश्रू आले व बाबांच्या चरणी मस्तक ठेवून ते परत आले. याप्रमाणे अनेक अनुभव त्यांना आले.

### शिरडीला कायमचे येऊन राहण्याची इच्छा

पंढरपूरास असताना श्री विठोबाच्या देवालयातील आरतीच्या हक्कासंबंधी काही मुकदमा तात्यासाहेबांपुढे होता व आपल्या नेहमीच्या सत्यान्वेषी व सडेतोड वृत्तीस अनुसरून साधारण लोकांच्या कल्पनेविरुद्ध त्यांनी त्या प्रकरणात निकाल दिला. पुढे काही दिवसांनी विश्रांतीसाठी त्यांनी रजा घेतली व रजेचे दिवस घालविण्यासाठी ते सहकुटुंब शिरडीस जाऊन राहिले. तात्यासाहेबांनी दर्शन घेतल्यावर "तात्याबा, आलास! बरे झाले. केव्हा जाणार?" वगैरे प्रेमळ शब्दांनी बाबांनी त्यांचे स्वागत केले. तेव्हा तात्यासाहेब म्हणाले, "बाबा, आता येथून जाऊ नये, असे वाटते. आता येथेच राहू द्या. कोर्टात श्री विठ्ठलासंबंधी माझ्या हातून न्याय झाला आहे. आता मनुष्याचा न्याय करण्यास मला लेखणी घ्यायला लावू नका. आता पुरे झाले." तेव्हा "बरे तसेच होईल," असे बाबांनी अर्थपूर्ण उद्गार काढले.

### बालमित्राचे शिरडीत अचानक येणे

लहानपणी तात्यासाहेब नूलकर व श्री. निलकंठ रामचंद्र उर्फ बाबासाहेब सहस्रबुद्धे हे पुणे हायस्कूलमध्ये शिकत असता उभयतांचा स्नेह होता. परंतु पुढे २५-३० वर्षे एकमेकांची गाठ कधी पडली नाही. आता तात्यासाहेब शिरडीत साठ्यांच्या वाड्यात बसले असताना त्यांना हाक मारीत एक गृहस्थ जवळ आला आणि त्याने त्यांना नमस्कार केला. त्यावर तात्यासाहेब म्हणाले, "तुम्ही मला ओळखलेत यात शंकाच नाही. परंतु मला तुमची ओळख बरोबर पटली नाही म्हणून फार वाईट वाटते." त्यावर तो गृहस्थ म्हणाला, "तुम्हास एकदा पाहिले तरी विसरणे शक्य नाही, असे तुम्ही आहात आणि माझ्यासारखी माणसे शेकडो असतील व आपली आज २५-३० वर्षे गाठ पडलेली नाही. तेव्हा तुम्ही मला न ओळखणे अगदी साहजिक आहे. परंतु आता पुणे हायस्कूलातील निलकंठ सहस्रबुद्धे या नावाचा कोणी मनुष्य तुमच्या परिचयाचा होता का, याची आठवण करा." इतके त्याचे शब्द ऐकल्यावर तात्यासाहेब त्यांना कडकडून भेटले. पुढे कुशल प्रश्न झाल्यावर सहस्रबुद्धे यांनी आपण मुंबईहून नानासाहेब चांदोरकर व काकासाहेब दीक्षित यांनी रेल्वेभाड्याच्या खर्चाचे पैसे देऊन केलेल्या मोठ्या आग्रहामुळे शिरडीला कसे आलो, हे सांगितले व काकासाहेबांनी माधवराव देशपांड्यांच्या नावाची चिठ्ठीही दिल्याचे सांगितले. तेव्हा

तात्यासाहेब म्हणाले, "माधवराव देशपांड्यांना बोलावून आणूच, पण तुम्ही आता माझे पाहुणे आहात व तुमची सर्व तजवीज लावण्याचा हक्क माझा आहे."

नंतर स्नान वगैरे केल्यावर ही मंडळी बापूसाहेब जोग यांच्याबरोबर आरतीकरिता मशिदीत गेली. सहस्त्रबुद्ध्यांनी नमस्कार केल्यावर बाबा त्यांना म्हणाले, "तात्याबाची सेवा करीत जा." हीच आज्ञा बाबांनी पुन्हा दुसऱ्या व तिसऱ्या दिवशीच्या आरतीच्या वेळीही केली. परंतु त्यातील गुढार्थ तात्यासाहेब व सहस्त्रबुद्धे ह्या दोघांनाही समजला नाही. पुढे "आपल्या गुरूच्या आज्ञेप्रमाणे मी तुमची काय सेवा करू ते तुम्ही सांगा," असे थट्टेने म्हणून सहस्त्रबुद्धे तात्यासाहेबांच्या सारखे पाटीस लागत. तेव्हा एक दिवस तात्यासाहेब म्हणाले, "हे गूढ काय असेल ते त्यांचे त्यांनाच ठाऊक! योग्य वेळ आल्यावर पुढे आपल्याला कळेल. तुम्ही आणि मी एकाच वर्गातले असून मी येथे आल्यावर जिरलो आहे. अशी तुमचीही कदाचित स्थिती होईल. हा तुमचा थट्टेचा प्रकार आता मेहेरबानी करून बंद करा. त्याने मला फार दुःख होते."

मधून मधून माधवराव देशपांडे बाबांच्याजवळ सहस्त्रबुद्ध्यांच्या जाण्याबद्दल गोष्ट काढीत, तेव्हा प्रत्येक वेळी "जाईल चार दिवसांनी," असे बाबा म्हणत असत. एकदा तर शेवटी ते म्हणाले, "त्याला येथे मशिदीपुढे असाच कुत्र्यासारखा पडून राहू दे. त्याचे आपल्याला पुढे फार मोठे काम आहे, ते तुला काय ठाऊक! तो येथे उगीच आला नाही."

**अखेरचा आजार व बालमित्राकडून सेवा**

यानंतर दहा-पंधरा दिवसांनी तात्यासाहेबांना पूर्वीपासून मधुमेहाचा विकार असल्याने त्यांना ढुंगणाजवळ एक काळपुळी होऊन ते आजारी पडले. हळूहळू अंगावर आणखीही काळपुळ्या होऊन तो आजार वाढत चालला. परकार्याकरिता सहस्त्रबुद्ध्यांची कंबर नेहमीच बांधलेली असे. परंतु हे मित्रकार्य असून सेवा करण्याबद्दल बाबांची आज्ञाही झाली होती. तेव्हा ते तात्यासाहेबांजवळ रात्रंदिवस ठाण देऊन बसले आणि ते बरे होईपर्यंत त्यांच्या शुश्रुषेत यत्किंचितही अंतर पडू द्यावयाचे नाही व तेथून जाण्याचा विचारही करावयाचा नाही, असा त्यांनी निर्धार केला.

तात्यासाहेबांची दोन्ही मुले जवळ होती व तीही शक्य ती शुश्रुषा करीत होती. त्यातील थोरला मुलगा वामनराव डॉक्टर असून नुकताच एल्.एम्. अॅण्ड एस्. झाला होता. त्या लहानशा गावी इंग्रजी औषधोपचाराची व शस्त्रक्रियेची काही सोय असणे शक्य नव्हते. तथापि मुंबईस तार करून डॉ. वामनराव यांनी सामग्री मागवून वडिलांच्या अंगावरील काळपुळ्यांवर योग्य ती शस्त्रक्रिया केली व बँडेज वगैरे बांधून उपचार सुरू केले. दिवसा व विशेषत: रात्री एखादी निष्णात परिचारिका काय काम करील, एवढे परिचर्येत सहस्त्रबुद्धे अगदी तरबेज असत. रात्री तात्यासाहेबांनी अगदी हलक्या सुरात हाक मारताच ते ताबडतोब उठून बसत व काय पाहिजे म्हणून विचारून सर्व काम करीत असत.

**अलौकिक साक्षात्कार**

तात्यासाहेबांच्या आजाराचा पाय पुढे पुढेच पडत होता. तथापि तात्यासाहेबांच्या मनाची स्थिती मात्र अलौकिक होती. त्यांना कसलीही लौकिक इच्छा नव्हती. आपण बरे व्हावे, असेसुद्धा त्यांना वाटत नसावे व त्याबद्दल त्यांनी कधी साईंची प्रार्थनाही केली नाही. कमीजास्त होता होता त्यांच्या अंगावर एकंदर अकरा काळपुळ्या आल्या होत्या. त्यांचे ड्रेसिंग वगैरे करतेवेळी फार वेदना होत, पण ते सारे ते शांतपणे सहन करीत. श्री साईदेवाशिवाय कसल्याही गोष्टी त्यांना आवडत नसत. वाड्यात एकाच जागी पडून राहावे लागे व कुशीवरून वळतानासुद्धा दुसऱ्याची मदत लागे. तथापि, आजारात येणारा तिरसटपणाही त्यांना आला नव्हता. मशिदीत काय झाले, बाबा काय बोलले व तेथे काय घडले, हेच ते नित्य विचारीत व अक्षय नामस्मरण करीत असत. त्यांच्या वृद्ध व प्रेमळ मातोश्री व बंधु वगैरे जळगावी होते. त्यांना तार करून बोलावतो, असे म्हटल्यास "त्यांना त्रास देऊ नका. मला कोणासही भेटण्याची इच्छा नाही," असे त्यांनी स्पष्टपणे व शांतपणे सांगावे, असे होत असे.

यानंतर तात्यासाहेबांना एक अलौकिक साक्षात्कार घडला. वाड्यात सारखे अंथरुणात पडून आडवे राहिल्यामुळे त्यांना मशिदीत जाणे सर्वथैव अशक्य होते व बाबाही गावाबाहेर प्रात:विधीस जाण्याच्या ठराविक मार्गाशिवाय कोणाच्या घरी सहसा जात नसत. वाड्याच्या मागील दरवाजावरून हा त्यांचा मार्ग होता व फेरीच्या वेळी सर्व मंडळी या दरवाजाबाहेर जाऊन वाटेत बाबांचे दर्शन घेत असत. परंतु बिछान्यातून उठताही न येऊ शकल्याने तात्यासाहेबांना बाबांच्या चरणांचे दर्शन बरेच दिवसात घडले नव्हते. पूर्वी सांगितल्याप्रमाणे यावेळी बाबांच्या गोष्टीशिवाय दुसरा कसलाही विचार तात्यासाहेबांच्या मनात नव्हता. तेव्हा बाबांच्या सगुण रूपाचे दर्शन न झाल्याने त्यांच्या अंत:करणास अतिशय तळमळ लागून राहिली होती व शेवटी एकदा त्यांनी आपल्या थोरल्या मुलाला (डॉ. वामनरावला) तसे बाबांना जाऊन कळविण्याविषयी सांगितले. वामनराव मशिदीत गेले व तात्यासाहेबांची विनंती त्यांनी बाबांच्या चरणांजवळ केली व दर्शन व्हावे अशी फार इच्छा आहे, असे सांगताच, "होईल. अल्ला भला करेगा," असे उत्तर मिळाले.

त्यावेळी तेथे एक-दोन मुलांखेरीज कोणी नव्हते. मुले जमली म्हणजे बाबा फार मौजेच्या बाललीला करीत. मुलांची थट्टा-मस्करी करावी, त्यांना चिमटे काढावे, त्यांचे गालगुच्चे घ्यावे, मुके घ्यावे, अशी लीला चाले. यावेळी बाबा असेच

आनंदात होते. तेथील लक्ष्मण भटजींचा मुलगा बाप्पाजी हाही तेथे होता. गावच्या रस्त्यावर कोणी एक फेरीवाला कापड विकणारा चालला होता. त्याला चार लोकांनी बोलावून एका ओटयावर त्याच्या कापडांचे निरीक्षण चालले होते. तेथे बाप्पाजी गेला व त्यालाही एक जरीचा रुमाल घेऊन डोक्याला बांधण्याची इच्छा झाली व एक चांगला लाल रंगाचा जरीचा रुमाल घेऊन तो बाबांच्याजवळ आला व म्हणाला, "बाबा, हा मी घेऊ का?" बाबा म्हणाले, "घे. बांध." तेव्हा त्याने घडी मोडून तो आपल्या डोक्यास बांधला व बाबांच्या चरणांचे वंदन केले. तेव्हा बाबांनी त्याचे गालगुच्चे घेऊन कौतुक केले. त्याने आपल्या डोक्यावरचा रुमाल काढून तसाच बाबांच्या मस्तकावर ठेवला व हसू लागला. बाबांनीही तो रुमाल तसाच काही वेळ राहू देऊन ऐटीने चहूबाजूस पाहून हास्य केले. मग तो रुमाल काढून पुन्हा बाप्पाजीच्या डोक्यावर घातला. बाप्पाजीने पुन्हा तो बाबांच्या मस्तकावर ठेवला व बाबांनी तो पुन्हा परत दिला. याप्रमाणे झाल्यावर वामनराव वाडयात परत आले. नित्याप्रमाणे तात्यासाहेबांनी मशिदीत काय काय झाले व बाबा काय काय बोलले म्हणून वामनरावांना विचारले. परंतु वरील हकीकतीत सांगण्यासारखे असे काहीच महत्त्वाचे घडले नसल्यामुळे "काही विशेष झाले नाही," असे सांगितले व दर्शनाविषयी त्यांचा निरोप कळविला, असेही सांगितले. तरी तात्यासाहेबांना समाधान होईना व त्यांनी पुन्हा पुन्हा खोदून विचारले की इत्थंभूत काय काय तेथे घडले, ते सांग. तेव्हा त्यांनी बाप्पाजीच्या रुमालाची वरील हकीकत सांगितली. ती ऐकत असता तात्यासाहेबांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू येऊ लागले व ते स्तब्ध झाले. असे होण्याचे कारण विचारता ते म्हणाले, "झाले, दर्शन झाले, असे बाबांना जाऊन सांग." नंतर पुन्हा विचारता त्यांनी आपणास याचप्रमाणे लीला करीत असलेल्या श्री साईदेवाचे साक्षात् दर्शन झाल्याचे सांगितले. हा प्रकार मशिदीत घडत असता तेथे वाडयात त्यांना प्रत्यक्ष दिसले की एका मुलाने एक मोठे थोरले लाल जास्वंदीचे फूल आणून बाबांच्या मस्तकावर ठेवले. तेच पुढे त्यांनी त्या मुलाच्या डोक्यावर ठेवले व त्याचे गालगुच्चे घेतले. पुन्हा त्याने ते बाबांच्या मस्तकावर ठेवले व मग त्यांनी ते परत दिले. याप्रमाणे फार दिवस तळमळ लागली होती तिचे सार्थक झाले, असे वाटून ते सद्गदीत झाले.

### देहावसान

तात्यासाहेबांचे दुखणे विकोपास जाऊ लागले तरी त्यांच्या कुटुंबीयमंडळींना असे वाटे की बाबांच्या कृपेने त्यांना बरे वाटेल. सहस्रबुद्धे त्यांच्याशेजारीच पडून असत. त्याच सुमारास तात्यासाहेबांचे मेहुणे त्यांच्या भेटीकरिता तेथे आले होते. तात्यासाहेबांचे त्यांच्या मेहुण्यावर अत्यंत प्रेम होते. त्यांचे त्यांच्याशी किरकोळ कुशल प्रश्न वगैरे झाले. परंतु प्रापंचिक विषयाबाबत ते काहीच बोलले नाहीत. तो १९११ चा मार्च महिना होता.

एके दिवशी रात्री सुमारे दोन वाजता तात्यासाहेब आपल्या नोकरास हाक मारू लागले. तेव्हा लगेच उठून "तुम्हाला काय पाहिजे" म्हणून सहस्रबुद्धयांनी विचारले. तेव्हा ते म्हणाले, "निलकंठराव, काय कपाळ सांगू! मला शौचाला लागली आहे आणि ते घमेले आणावयास तुम्हाला सांगू की काय!" तेव्हा सहस्रबुद्धे म्हणाले, "आता हा खुळेपणा सोडून द्या. परम प्रेमाच्या ठिकाणीसुद्धा हा शिष्टाचार करण्यात काय अर्थ आहे!" असे म्हणून सहस्रबुद्धयांनी तात्यासाहेबांचे शौचाचे पात्र त्यांच्या अंगाखाली घालून शौचविधि झाल्यावर ते बाजूला ठेवले.

डोळ्यांत पाणी आणून तात्यासाहेब म्हणाले, "निलकंठराव, अशी सेवा करावयाची पाळी पुढे येणार हे तुम्ही आलात त्यावेळी तुमच्या किंवा माझ्या स्वप्नात तरी कसे यावे! येथे बाबांनी तुमच्यासारख्या शुश्रूषानिपुणाला केवळ माझ्याकरिता आणले असाच त्यांनी पहिल्यांदा लागोपाठ तीन दिवस केलेल्या आज्ञेचा अर्थ नव्हे का! तुम्ही नसता तर अशा या खेडयात माझे आणि माझ्या कुटुंबातील माणसांचे किती हाल झाले असते!"

पुढे रात्री तीन वाजता तात्यासाहेबांना शौचास लागली. सहस्रबुद्धयांनी आणि वामनरावांनी त्यांना धरून शौच आटोपल्यावर पुन्हा ड्रेसिंग केले. त्यावेळेपासून त्यांना अशक्तता वाटू लागली. पण ते एकसारखे नामस्मरण करीत स्वस्थ पडून राहिले होते. मग त्यांनी आपल्या धाकटया मुलास उठविण्यास सांगितले.

दोघा मुलांना उद्देशून ते म्हणाले, "भजन करा." ती अखेरची वेळ आहे असे तेव्हाच वाटू लागले. मुलांनी हातात चिपळ्या घेऊन मोठयाने भजन करण्यास सुरूवात केली. त्यावेळी भोवतालची काही मंडळी उठून बसली. सरासरी दीड तास भजन चालले होते व तात्यासाहेब शांत चित्ताने ऐकत होते. पण त्यांना फार शीण आला होता. वामनरावांनी नाडी पाहिली, तो अतिशय क्षीणता आलेली दिसली व काही उत्तेजक उपचार करण्याकरिता हायपोडर्मिक सिरिंज पाहू लागले, तो ती फुटली होती, म्हणून निरूपाय झाला. भजन चालूच होते. सुमारे ४॥-५ च्या सुमारास तात्यासाहेबांनी जरा हात वर करून भजन थांबविण्याची खूण केली व हलक्या आवाजात काही सांगितले. मुलांनी कान जवळ नेऊन ऐकले, तो ते म्हणाले, **"आता दृष्टीपुढे ऐसाची तू राहे। जो मी पाहे पांडुरंगा॥"** तो अभंग मुलांनी म्हटला, त्यावेळी तात्यासाहेब कोणत्या सुखात होते कोण जाणे! पण त्यांच्या मनाच्या ईश्वराशी अगदी पूर्ण तादात्म्य झाले असावे, असे दिसत होते. नंतर त्यांनी मुलांना थांबण्याची खूण केली व स्वस्थ पडून राहिले. तात्यासाहेबांच्या पत्नी, मेहुणे, काकासाहेब दीक्षित वगैरे बरीच मंडळी तेथे होती.

इतक्यात तात्यासाहेबांच्या धाकटया मुलाने धावत जाऊन श्रीराधाकृष्णआईकडून तीर्थ व उदी आणली. तात्यासाहेबांच्या कपाळाला उदी लावली, तेव्हा त्यांनी डोळे स्वच्छ उघडून

एक वेळ चहूकडे पाहिले. त्यावेळी त्यांचे गांभीर्य आणि तेजस्वी व भेदक दृष्टी फार पाहण्यासारखी होती. नंतर चमच्याने त्यांना तीर्थ दिले. त्यांनी तोंड उघडले व एक, दोन व तीन याप्रमाणे तिसरा चमचा तीर्थ दिल्याबरोबर त्यांचे प्राण विसर्जन झाले. तत्पूर्वी थोडा वेळ अगोदर मशिदीत श्री साईबाबा म्हणाले, ''आपल्या मशिदीच्या पाठीमागे एक मोठा तारा पडला'' व नंतर अंगणात येऊन त्यांनी बोंब मारली. असा प्रकार केव्हा केव्हा त्यांचा एखादा भक्त हरपला म्हणजे ते करीत असत.

### अग्निसंस्कार व बाबांचा शोक

नंतर वाड्यात जमलेल्या सर्व मंडळींनी चरणांवर मस्तक ठेवून वंदन केले व रीतीप्रमाणे त्यांना मशिदीच्या दारावरून नेण्यात आले. स्मशानभूमीत त्यांचा देह चितेवर ठेवला तोच बाबांच्या भक्तश्रेष्ठ राधाकृष्णआई या बाबांचा मार्ग झाडीत होत्या, त्या हातात खराटा घेऊन मोठ्याने आक्रोश करीत वायुवेगाने धावत आल्या व ''माझ्या आईचा लाडका गेला'' म्हणून चितेस धावत धावत एक प्रदक्षिणा घातली व तात्यासाहेबांच्या मुखाचे चुंबन घेऊन, चरणांवर मस्तक ठेवून त्या परत निघून गेल्या. रीतीप्रमाणे नंतर अग्नी देऊन सर्व मंडळी परत आली.

त्या दिवशी बाबांचा नित्याचा कार्यक्रम म्हणजे तोंड धुणे, भिक्षा, न्याहारी, पूजा वगैरे सर्वच लांबणीवर पडून त्यांनीही शोकाचा आविर्भाव आणून व ''माझा तात्याबा गेला. आता मला काय करायचे! मी बी चालला जाईन. कशाची मशिद, कशाची शिरडी. तात्याबा चांगला होता. त्याने माझे ऐकले. मी त्याच्या जीवाचे सार्थक केले. त्याची सर कोणाला यायची नाही. त्याला मीच तारला,'' असे उद्गार काढले.


नंतर तिसऱ्या दिवशी बाबा शिरडीच्याजवळ निमगाव म्हणून गाव आहे, तेथे जाऊन बसले. भक्तमंडळी व गावचे सर्व लोक हवालदील झाले व तपास करून मग पुढे भजनीमंडळी व छत्र अबदागीर वगैरे घेऊन थाटाने वाजत-गाजत बाबांना परत शिरडीला घेऊन आले. त्यावेळी तात्यासाहेबांच्या अस्थि-रक्षा वगैरे गाडीत घालून कोपरगावी गंगेत विसर्जन करण्यास चालल्या होत्या. ती गाडी व बाबा निमगावाहून परत येत असता त्यांची गाठ पडली. तेव्हा बाबांनी उभे राहून त्या गाडीकडे काही विवक्षित हस्तविक्षेप केले व मग पुढे चालू लागले.

### लॉकेटची अपूर्व कथा

कै. तात्यासाहेबांवर बाबांचे किती अनुपम प्रेम होते याचे प्रत्यंतर येण्यासाठी त्यांच्या नातवाने आणखी एक अनुभव सांगितला व त्याबद्दलचा खुद्द बाबांच्या लाडक्या शामाच्या हस्ताक्षरांचा अगदी खात्रीचा पुरावाही सादर केला. तोही वाचण्यासारखा असल्याने त्यांच्याच शब्दात खाली देत आहे:

''आमचे आजोबा शिरडीला १९११ साली वयाचे ४८व्या वर्षी गेले. त्यानंतर आमचे आजीचे (कै. श्रीमती जानकीबाई) इच्छेवरून वडिलांनी एक लॉकेट करून घेतले. त्यात एका बाजूला श्री साईबाबांचा व दुसऱ्या बाजूला आजोबांचा फोटो होता. ते तिला पूजेत ठेवावयाचे होते. हे लॉकेट शिरडीला रवाना करून ते बाबांच्या हस्ते परत मिळावे असा हेतू असावा. ते पोस्ट पार्सल शिरडीला पोहोचल्यावर काय घडले ते कै. माधवराव देशपांडे (शामा) यांनी आमच्या वडिलांना पत्राने कळविले. त्या पत्राचे छापण्याच्या सोयीसाठी थोडे लहान केलेले छायाचित्र असे:

(उर्वरित भाग पृष्ठ क्र. ५४ वर)



# माधवराव उर्फ शामा देशपांडे-शिरडीकर-अल्पचरित्र

श्री गणेशास वंदन असो॥ श्री गुरुस वंदन असो॥ श्री साईनाथांना वंदन असो॥

शिरडी गांवी महान संत। श्री साईनाथ अवतरले॥ संत म्हणू नये तयांसि। प्रत्यक्ष देवचि श्री साई। तयांचे थोर भक्त। माधवराव देशपांडे उर्फ शामा॥ "माझा शामा असेल खुळा। परी मजला तयाचा लळा॥" तयाविषयी वदले बाबा॥ अल्प चरित्र लिहावयाचे। तयांचे प्रयत्न हा स्वल्प॥ सन १८६० (?) जन्म॥ बालपणी माता तयासी। 'बब्या' म्हणूनी हाकारी॥ पुढे मोठेपणी शाळेसी॥ मास्तराची नोकरी लागली। शाळेजवळील मशिदीस। श्री साईंचा नित्य वास॥ कधीमधी येता-जाता॥ अवचित स्नेह जडला॥ सुरुवातीस माधवराव। साईस मानिना अवलिया॥ पुढे पुढे देव मानू लागले। पाणी सोडून मास्तरकीवर॥ साईसेवेस लागले। चिलीम द्यावी भरून साईस। त्यांनी आग्रहता झुरकाही मारावा॥ बाबांचे लाडके 'शामा' म्हणूनी। सर्वत्र ख्याती पावले॥ अवचित येता मनी साईंच्या। कुणास दर्शन नाकारती। तव तयांनी माधवरावासी। करूनिया लांगूलचालन॥ दर्शनलाभ जोडावा॥ साईसमीप जाण्यास्तव। माधवासी ना केवि बंदी॥ दिवसरात चोवीस तास। मनी येता जावे मशिदीसी॥ तया न मज्जाव साईंचा॥ साईंचा पत्रव्यवहार शामा। सांभाळू लागले पुढे पुढे॥ एकदा तयांस आली लहर। दोन रुपये एका भक्ताचे। साईस न देता परस्पर। जमिनीत पुरुन ठेविले॥ मजला वाटे साईंची परीक्षा। पहावयाचा हा बेत तयांचा॥ खरे-खोटे साई जाणे॥ असो पुढे काय झाले। एका रात्री शामाकडे॥ चोरीस गेले अडीचशे रुपये॥ तव ते म्हणती बाबांसी। बाबा चोरट्यांनी घर धुतले॥ अडीचशे रुपये गेले की॥ तव बाबा काय वदती। तुझे अडीचशे गेले परी। माझी दोन रुपयांची चोरी॥ मी कोणास सांगू फिर्याद। तव ते माधवराव॥ बाबांवरी कोपू लागले॥ तूवा चोरी करवली॥ म्हणूनि दोष देऊ लागले॥ तव बाबा वदती तयास। तुला जसे अडीचशे रुपये। तसेच मजला दोन रुपये॥ भक्ताची भावपूर्ण ठेव ती। ऐसे ऐकून बाबांचे बोल। माधवराव खिन्नवदन परतले॥ साई देव त्रिकालज्ञानी॥ जाणूनि भक्ताची कुडी-कामना। धडा त्यास शिकवला॥ सरळ रस्ता दाविला। शामाची साईनिष्ठा चोखट। कथा तयाची ऐका श्रोते॥ एके समयी माधवासी॥ सर्पदंश अतिजहाल जाहला। ऐशा त्या बिकट समयी॥ न करता आणिक उपाय काही॥ घाईघाई मशिदीस पातले॥ पायऱ्या चढू लागले तोच। साई जाहले कोपायमान॥ "हां हां भटुरड्या चढू नको वर"। साई वदते जाहले॥ माधवराव आधीच त्रस्त। साईसी देखून कोपग्रस्त॥ भयग्रस्त जाहले॥ सरली अवघी आशा जीवाची॥ तेथेच बैसते जाहले। साई होता निवांत मागुति॥ चरणासी येऊन बैसले॥ तव श्री साई तयांस वदे। "होऊ नको चिंताग्रस्त॥ घरी जाऊनि बैस स्वस्थ॥ भरवसा ठेव अल्लावर। अल्ला मालिक तारील"॥ ऐकूनी ऐसे साईवचन। निश्चिंत होऊन मानसी॥ माधवराव परतले गृहासी॥ विष न चढता सापाचे। पूर्ण स्वस्थ जाहले॥ ऐसेच एकदा अक्षिरोगग्रस्त॥ डोळे सुजून झाले लाल। अतिदाह होऊ लागला॥ साईंनी त्यास कथिला। ऊपाय एक अघोरी॥ वदले "मिरे कुटूनी बांधी॥ जा डोळियांसी होईल बरे"। माधवराव वदे, "देवा॥ काय हा ऊपाव अतर्क्य॥ डोळे फोडून घेतो स्वहस्ते"॥ परि ते निश्चिंत मानसी। विश्वास साईवर अचल॥ जैसे कथिले तैसेच केले। रोगमुक्त झणि जाहले॥ शामास साईंचा अनुग्रह भारी। काही भक्त घेऊन येती। धार्मिक ग्रंथ साईप्रती॥ अर्पून वापस नेण्यास्तव। तव साई ते ग्रंथ। तयास न देता॥ शामाप्रती देत की वाचावया॥ ऐसेच एकदा शामाने। महाजनींचे भागवत घेतले॥ वाचून परते करावया। तव साईंनी त्यास ते। स्वतःप्रती ठेविण्यास आज्ञापिले॥

तैशीच एका रामदास्याची। विष्णूसहस्रनामाची पोथी॥ स्वये बाबांनी चोरूनी। शामास दिधली वाचावया। शामा वारंवार वदे की॥ "मज नको ती चोरीची॥" तव साई वदे तियेची महती। "शामा ही पोथी कनी। आहे पहा बहुगुणी॥ ओजे ओजे वाचत जाई॥ आनंददाई ही मोठी।" बळेचि सोपली शामास। शामानेही ती जाणून घेऊन। नित्य पठण्यात ठेविली॥

साईशामाचे एकमेकां प्रेम भारी। अरे-तुरे एकमेकां वदति॥ अर्जुनाची श्रीकृष्णाप्रति जैसी। तैसीच ही सख्य-भक्ति॥ दुपारची आरती संपता। शामा साईसी वदे। "हां हां देवा ऊठ आता। करुनि सारा नैवेद्य काला॥ भक्तांप्रति वाटून टाक।" साईआज्ञा प्रमाण मानीत। शामास कोळंब्याची नाही गोडी॥ आणून त्याप्रती हापूस। आंब्याच्या रसाळ फोडी॥ श्री साईनाथ अर्पित की। बाबा ईतरांस पैसाअडका देत कधी। माधवासी ना देत ती। कधी कधी माधव अतित्रस्त। होऊनी बाबांस वदतसे। "देवा ऐसा कैसा तू भिकारडा॥ मजला काही न देतसे।" तव बाबा त्यास वदे। "माधवा तुजसाठी वेगळेच आहे॥" म्हणून समज तयाची करीतसे। पैशाची अति हाव। परमार्थास घातक फार॥ भक्तास करण्या परमार्थप्रवण॥ बाबांची ऐसी रीत ही॥ माधवानेही पुढे समयी। बाबांसाठी बारा वर्षे भिक्षाव्रत आचरिले॥ भक्ती चोखट दाविली। माधवरावास एकदा आले मनी। करूनि यावे तीर्थाटन। तव बाबांनी त्यास देऊनि अनुमोदन। अयोध्या, प्रयाग, मथुरा, काशी॥ अल्प दामात तीर्थाटन करविले। एकदा एक भक्तश्रेष्ठ। घेऊन चांदीचे नाणे। एका बाजूस राम-सीता। पाठीसी श्री हनुमान कोरलेले॥ साईस्पर्श करुनि पूजावयास्तव। अर्पियेले साईनाथांसी॥ साईंनी दिधले शामासी। वदले तयास "देवघरात।

ठेऊनी नित्य पूज यासी ॥''

रात्रीचा समय एकदा। तात्या नूलकर अत्यवस्थ॥ तयास श्रीचरणोदकाची आस। कोणी न धजे साईकडे जावया। त्या समयासी माधवराव। गेले मशिदीसी। साई अतीव कोपायमान। न देई चरणोदक॥ तयास करुनि शांत। चरणोदक आणले। तात्या नूलकर पूर्णकाम॥ देहावसान लाधले। ऐसे हे माधवराव। लोण्यापरि मऊ मन। साई देहावसान पश्चात॥ आठवूनी आपले कटू वचन। पश्चात्तापग्रस्त वरचेवर। त्यांस रडू कोसळे॥ बाबांची चिलीम आणि सटका। दिधला तयांनी बापूसाहेब जोगांसी॥ योग्य पूजन करावया। एकदा मुंबई प्रांती। रात्री स्वप्नात येती साई॥ वदति ''जा लगबग घरासी। ऊदी चालली ऊकिरडचावर''। तत्काळ येऊनी घरासी। पाहती तो सत्य॥ अजाण स्त्रिया घरातील। ऊदीचे रांजण भरलेले। समजूनी राख तिसी। तत्पर सांडावया॥ तव ते रांजण घरात आणूनि ठेविले। आणिकही अनेक प्रसंग। वर्णियेले हेमाडपंतांनी॥ श्री साईसच्चरितात। वाचकांनी तेथ ते वाचावे॥

पुढे म्हातारपण येता। राहत्या घराचे भाडे येई। स्वत: राहती साठ्यांच्या वाड्यात। व्यवस्था पाहती वाड्याची। तैसीच समाधी मंदिराची॥ बापूसाहेब त्याप्रित्यर्थ। मासिक सात रुपये मेहनताना॥ माधवरावास आमरणान्त देत॥ तयांच्या पश्चात तयांचा पुत्र। परंपरा पुढे चालवी॥

२६-४-१९४० पवित्र दिनी स्वगृही। अंतसमयी कष्ट न होता॥ साईचरणी विलीन जाहले॥

स्वस्ति श्री साईनाथ प्रेरित। भक्त शामा अल्पचरित कथन समाप्त॥ सद्गुरु श्री साईनाथांना अर्पण असो। शुभ होवो॥

—डॉ. अभय दमणकर
वसई (प.), ठाणे.

---

(पृष्ठ क्र. ५२ वरून)

माधवराव देशपांडे हे शिरडी गावातले प्राथमिक शाळामास्तर होते. त्यांचे मराठी शिक्षणही बेताचेच होते. शिवाय त्याकाळची खेडवळ मराठी भाषाही थोडी वेगळी होती. म्हणून या पत्राचे आजच्या मराठीत शुद्धीकरण करून ते वाचकांच्या सोयीसाठी पुन्हा खाली देत आहे:

शिर्डी ॥ श्री ॥ तारीख
२०/१२/१९१२

साष्टांग दंडवत, विज्ञापना,

आपलेकडून काल रोजी म्हणजे तारीख १९ गुरुवारी महाराजांचे आरतीचे वेळेस महाराजांपाशी पोस्टाचे शिपायाने आपलेकडून लॉकेटचे पार्सल दिले आणि महाराजांनी हाती घेऊन पार्सलची डबी आपल्या तोंडावर फिरविली व या डबीचे मुके घेतले. नंतर मजला सांगितले, 'आत दोन बुवा आहेत' असे महाराज बोलू लागले. मग महाराजांनी (पार्सल) फोडून माझ्या स्वाधीन केले. आत उघडून पाहता फोटोचे लॉकेट व वहिनी साहेबांचे पत्र होते ते महाराजांना वाचून दाखविले. फोटो हातात पंधरा वीस मिनीटे होता. प्रत्येक आरतीस आलेल्या लोकास दाविला (दाखविला) आणि म्हणू लागले, 'हाच बुवा मला घेऊन गेला' असे महाराजांनी अक्षरे काढली तीच लिहून पाठविली आहेत. लॉकेट माझे स्वाधीन केले आणि जपून ठेव असे सांगितले. बाईसाहेबांस नमस्कार. कळावे ही विनंती.

साईदास,
माधवराव देशपांडे

वरील पत्रावरून कै. तात्यासाहेब नूलकरांवर बाबांचे किती गाढ प्रेम होते हे कळून येते. बाबांनी 'लॉकेटमध्ये दोन बुवा आहेत' असे म्हणून तात्यासाहेबांना आपल्या बरोबरीचे म्हणून त्यांची आध्यात्मिक श्रेष्ठता तर दर्शविलीच, पण नंतर तात्यासाहेबांच्या फोटोकडे पाहून बाबांनी 'हाच बुवा मजला घेऊन गेला' असे जे उद्गार काढले, त्यावरून तात्यासाहेबांचा आत्मा त्यांच्या देहत्यागानंतर बाबांशी एकरूप झाला होता हे सिद्ध होते.


**''धन्य तात्यासाहेब नूलकर।**
**अंती शिरडीत भजन तत्पर।**
**जिंहीं कलेवर विसर्जिले॥११९॥**
**अंतकाळीं जें जें ध्यान।**
**तें तेच रूपें पुनर्जनन।**
**भगवत्पदीं झालिया लीन।**
**जन्मविहीन होई तो॥७॥''**

**काया जरी मानवाची। करणी अपूर्व देवाची। शिरडींत प्रत्यक्ष देव तो हाचि। भाविती हेंचि जन सारे॥३५॥ काय बाबांचे चमत्कार। किती म्हणून मी वर्णूं पामर। देवा-देउळांचेही जीर्णोद्धार। बाबांनीं अपार करविले॥३६॥ शिरडीस तात्या पाटिला हातीं। शनी-गणपती-शंकरपार्वती। ग्रामदेवी आणि मारुती। यांचीही सुस्थिति लाविली॥३७॥**

—अध्याय ७, श्री साईसत्चरित

# श्री क्षेत्र कनकेश्वर

–डॉ. यशवंत केवळे
मुलुंड, मुंबई.



रम्य स्थान गती। तपोवनी शांती॥
से डोंगरमाथ्यावरती। श्री क्षेत्र कनकेश्वर॥

कैलासपती श्री शंकराची बहुतेक स्थानं अत्यंत दुर्गम ठिकाणी वसलेली आढळतात. संपूर्ण रायगड जिल्ह्यात प्रसिद्ध असलेले श्री क्षेत्र कनकेश्वरही त्यास अपवाद नाही. मराठ्यांचे आरमारप्रमुख सरखेल सरदार कान्होजी आंग्रे यांचे हे कुलदैवत.

मुंबईहून अलिबागकडे जाताना पोयनाड मागे टाकल्यानंतर उजव्या हाताला उंचच उंच डोंगरांची रांग दिसते. याच डोंगरमाथ्यावर श्री कनकेश्वर क्षेत्र वसले आहे. कार्ले खिंडीच्या किंचित् अलिकडे उजव्या बाजूस थळ प्रकल्पाकडे जाणारा रस्ता फुटतो, त्याच रस्त्याने पाच कि.मी. पुढे गेले की कनकेश्वर-गढी चढण्याच्या पायऱ्या दिसतात. पायथ्याशी मापगाव आहे. एकूण ७५० पायऱ्या असून त्या कमी उंचीच्या व पाच फूट लांबीच्या असल्याने चढताना फारसा थकवा जाणवत नाही. गडाची उंची २५०० फूट असून पायथ्यापासून देवस्थानपर्यंतचे अंतर पाच कि.मी. आहे. सामान्य चालीने व विश्रांती घेत साधारणत: तासा-दीडतासात देवळात पोहचता येते. वाटेत पाण्याची व विश्रांती-थांब्यांची व्यवस्था नाही. तुरळक झाडांची सावली हाच काय तो दिलासा! त्यामुळे पाण्याचा साठा व डोक्यावर टोपी आवश्यक असते.

या तपोभूमीला 'कनकेश्वर' नाव कसे पडले, त्याची एक मजेशीर दंतकथा प्रचलित आहे; ती अशी: अनेक ऋषी, मुनी व शिवभक्त आराधना, साधना व तपश्चर्या करण्यासाठी येथे वास्तव्य करीत असत. 'कनकसूर' नामक राक्षसही त्यापैकीच एक. त्याने या तपोभूमीत श्री शंकराची आराधना सुरु केली. त्याची उग्र तपश्चर्या पाहून श्री शंकर प्रसन्न झाले आणि त्याला हवा तो वर मागण्यास सांगितले. कनकसूराने "शंकरा, मला तुझ्याबरोबर द्वंद्वयुद्ध खेळावयाचे आहे", असा विचित्र वर मागितला. शंकराने 'तथास्तु' म्हटले. लगेच दोघांचे तुंबळ युद्ध सुरू झाले. कोणीही मागे हटेना. खडतर आराधनेमुळे प्राप्त झालेले कनकसूराचे

सामर्थ्य पाहून श्री शंकर प्रसन्न झाले व पुन्हा म्हणाले, "तुझा उद्धार होईल, असा आणखी एक चांगला वर माग". कनकसूराने दुसरा वर मागितला, "देवा, तुझे आणि माझे वास्तव्य या द्वंद्वयुद्धाच्या ठिकाणी कायमचे राहावे." श्री शंकराने 'तथास्तु' म्हटले व सांगितले, "या तपोभूमीवर तुला कायमचे स्थान पाहिजे असेल तर तू येथे पालथा झोप. मग मी तुझ्या पाठीवर यज्ञ करतो. हा यज्ञ केल्यानेच तुला मुक्ती मिळेल व तुझे नाव या पर्वतावर अजरामर होईल". क्षणाचाही विलंब न लावता पालथे पडून कनकसूराने देवाला आपल्या पाठीवर यज्ञ करण्यास सांगितले. यज्ञाचा अग्नी भडकला व काहीही हालचाल न करता कनकसूर भस्मसात झाला. तेव्हापासून या तपोभूमीला कनकेश्वर नाव पडले.

पूर्वी या कनकेश्वर-शिवलिंगावर देऊळ नव्हते. राष्ट्रकूट राजघराण्यातील राजांनी चौल भाग जिंकल्यानंतर चौल व चौलच्या परिसरात दहा शिवमंदिरे बांधली. त्या दहा शिवमंदिरांपैकी हे एक असावे. यादव घराण्यातील राजे रामदेवराय यांच्या कारकिर्दीत आजच्या स्वरुपातील कनकेश्वराचे मंदिर बांधले गेले असावे, असा उल्लेख कुलाबा गॅझेटिअरमध्ये आढळतो. राजे रामदेवराय यांच्या पदरी हेमाडपंत नावाचे विद्वान व शिल्पकलानिपुण प्रधान होते. याच शिल्पकाराच्या कारकिर्दीत अनेक हेमाडपंथी मंदिरे उभारली गेली. त्याच वेळेस सध्याचे कनकेश्वराचे मंदिर उभारले गेले असावे.

वाटेतील दगडी पायऱ्या २३० वर्षांपूर्वी सरदार राघोजी आंग्रे यांचे दिवाण गोविन्द खोदास या श्रीमंत भाविकाने स्वखर्चाने इ.स. १७६४ साली बांधल्या. ह्या पायऱ्या चढताना उजव्या हाताला 'मोहनगिरी' व 'बालगिरी' या साधुपुरुषांच्या पांढऱ्या समाध्या दिसतात. याशिवाय वाटेत नागोबाचा टप्पा, देवाची पायरी, गायमांडी (येथे विश्रांतीसाठी दगडी बाक असून चौथरा उभारला आहे.) इत्यादी स्थाने लागतात. गायमांडी येथे दगडावर गाईची आकृती कोरलेली आहे. येथून पुढचा रस्ता सपाटीचा व दुतर्फा अनेक उपयुक्त दाट झाडांनी वेढलेला आहे.

कनकेश्वर मंदिराच्या हद्दीत 'ब्रह्मकुंड' हा छोटेखानी कलात्मक बांधणीचा चार दरवाजे व पायऱ्या असलेला उत्तम स्थितीतील तलाव लागतो. येथे अस्थीविसर्जन व क्षौरविधी केले जातात. येथे नुकतेच जीर्णोद्धार केलेले मारुतीचे मंदिरही आहे. जवळच मिरचीबाबाची समाधी व नवीनच बांधलेले बौद्ध-स्तुपाच्या धाटणीचे 'श्रीकृष्ण-बलराम' मंदिर लागते. येथून समोर नजर टाकल्यास श्री क्षेत्र कनकेश्वराचे पांढरेशुभ्र व निमुळत्या शिखराचे हेमाडपंथी बांधणीचे मंदिर दिसते. देवळाला लागूनच मागे सुंदर व प्रशस्त बांधीव पुष्करणी दिसते. बाराही महिने ती पाण्याने भरलेली



असते. तेच पाणी देवपूजेकरिता वापरले जाते. मंदिरासमोर ५० x ५० फूटाचा सभामंडप असून गाभारा पाच फूट खोल आहे. शिवलिंगावर संपूर्ण नागफणीधारी चांदीचा मुखवटा बसविला असून त्यावर सतत अभिषेकाची धार चालू असते. देवळाचा कळस सोनेरी आहे. मंदिराच्या शिखरावर शिवपार्वती, नटराज, ब्रह्मसावित्री, तांडवनृत्य, भैरवी, कृष्ण, गणपती इत्यादी देवादिकांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. मंदिराच्या भिंतींवर देवी, हत्तीयुद्ध व वानरांच्या शृंखला कोरलेल्या आहेत. त्याचप्रमाणे गाभाऱ्याच्या चौकटीवर श्री गणेश व माळा घेऊन गाणारे यक्ष-किन्नर यांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. मंदिराच्या मुख्य दाराजवळ एक शिलालेखही आहे.

या परिसरात जी इतर देवालये आहेत त्यांचे वर्णन एका कवीने शब्दबद्ध केलेले आहे; ते असे :

**धन्य सुग्रास कनकेश्वर। कनकगिरी माथ्यावर॥**
**वृक्षराजी मनोहर। नानाविध दिसतसे॥**
**व्याघ्रेश्वर पूर्वद्वारी। पालेश्वर दक्षिणद्वारी॥**
**पात्रूबाई दक्षिणद्वारी। उत्तरद्वारी गायमुखी॥**
**तेथे श्रीराम सिद्धीविनायक। ताप तयांचा नाशक॥**
**चतुर्मुक्तीचा दायक। ऋद्धीसिद्धीसहित असे॥**

याशिवाय येथे काळभैरव मंदिर, शंकरगिरीमठ, स्वामी गुरुपादस्वामी यांचे स्मारक व कुंडेश्वराचे देऊळ आहे. मुंबई पॉईन्ट येथून कुलाबा, गेटवे ऑफ इंडिया, माझगांव गोदीचे मनोहर दृष्य दिसते. रात्रीची झगमगणारी मुंबई केवळ येथूनच पाहावी.

कनकेश्वरी रहाण्याची व जेवणाची सोय माफक दरात होते. येथे देवस्थानची धर्मशाळा, बापूभाई धर्मशाळा, भणसाळी ट्रस्ट धर्मशाळा आदी आहेत.

कार्तिकातील त्रिपुरी पौर्णिमेस व महाशिवरात्रीस कनकेश्वरी गडावर मोठी यात्रा भरते. तसेच श्रावणातील सोमवारीही दर्शनासाठी भाविकांची खूप गर्दी होते.


अलिबाग-रेवस मार्गावरील झिराड गावापासून कडचाच्या वाटेने व नारंगी गावाकडून कनकेश्वरीला येण्यास पायवाट आहे.

मुंबईहून भाऊचा धक्का येथून लाँचने रेवस बंदर येथे उतरता येते. रेवसहून अलिबागकडे जाणाऱ्या बसेसने चोंडीपर्यंत येऊन तेथून रिक्शाने तीन कि.मी. अंतरावरील कनकेश्वरपर्यंत जाता येते.

मुंबईतील परळ येथून सकाळी व संध्याकाळी रेवस, सासवणे ह्या कनकेश्वर-मार्गे बसेस आहेत.

बोरीवली येथून दुपारी बोरीवली-ठाणे-सासवणे बस आहे. तसेच अलिबाग-कनकेश्वर अशाही बसेस आहेत.

## शब्दशोध क्र. ७



### आडवे शब्द :–

१. साईबाबांची प्रसिद्ध उक्ती
५. बाबांची कफनी, मंदील धुणारा व शिवणारा (केवळ नाव)
६. द्वारकामाईतील उदी प्रसवणारा वन्हीनारायण
७. विजापुरी फकीर अथवा बाबांनी मानलेला गुरु
९. "बाबा रुपय्या, रुपय्या" म्हणून मागणी करणारी मुलगी
१२. हिंदूंची सात मोक्षदायक गावे
(१) अयोध्या (२) मथुरा (३) काशी (४) कांची
(५) द्वारका (६) अवंतिका आणि (७) .......
१३. बाबा 'हिला' रोज सहा रुपये देत, कोंडाजीची बायको

### उभे शब्द :–

१. साकोरीचे श्री उपासनी महाराजांचे जन्मगाव
२. श्री साईलीला मासिकाचे पहिले संपादक
३. ......, ज्ञान, भक्ती, योग ह्या चौमार्गाने परमेश्वरप्राप्ती होते.
४. साईबाबांचा पायघोळ अंगरखा
८. बाबांच्या जन्माबद्दल गुढांकित वलय आहे; कारण ते ........ होते असे म्हटले जाते.
९. अष्टमहासिद्धींपैकी पहिली
१०. श्री ज्ञानेश्वर महाराज
११. साईबाबांना अवगत असलेला एक दुर्मिळ योगप्रकार

–श्री. सतीश चुरी
विरार, ठाणे.

# सागर-सरिता

बालसाईभक्तांनो, पाळण्यामधील आपल्या निरागस बालकाला त्याची आई अंगाई-गीत मोठ्या प्रेमाने आळवित असते. त्यामागे तिचा उद्देश हा असतो की त्यामुळे बालकाच्या हृदयात सुरुवातीपासूनच प्रेम रुजावे. आईची ही बालकासाठी निष्काम सेवा होय! प्रेम हा निष्काम सेवेचा आत्मा आहे. प्रेमाला पारितोषिकाची आस मुळीच नसते. अंगाई-गीत हृदयाच्या भाषेत रचविलेले असल्यामुळे त्या गीतातील शब्द प्रेमाने न्हावून निघालेले असतात. या गीताची रचना म्हणूनच सरळ, साधी, सोपी, सहज अशी ओघवती असते.

रामायण, महाभारत, श्रीमद्‌भगवद्‌गीता यांसारखे आपले महान ग्रंथ काव्यात लिहिलेले आहेत. अगदी मोजक्या शब्दात मोठा आशय काव्यामध्ये भरलेला आढळतो. नेहमीच्या व्यवहारातील साधे विषय आकर्षकरीत्या मांडून वाचकांच्या मनावर स्पष्टपणे ठसविणे हे काव्याचे वैशिष्ट्य होय!

श्री साईबाबांच्या चरित्रावरून असे दिसते की बाबा भक्तांशी बोलताना मातेच्या ममतेने बोलत असत. त्यांचे बोल हृदयाची भाषा बोलत असत. पुरुष, स्त्री व इतर लहानथोर भक्तांना बाबा हाक मारीत त्यामध्येसुद्धा त्यांचे प्रेम ओतप्रोत भरलेले असे. बाबांचे बोलणे म्हणजे एकप्रकारचे काव्यच असे.

श्री साईबाबांच्या चरित्रावरून असे जाणवते की बाबांना आवड-निवड अशी नव्हती. तरीही कोणतीही गोष्ट ते त्यात आवड दाखवून करीत असत. जीवनात घडणाऱ्या सर्वच गोष्टी आपल्या आवडीच्या असतातच असे नाही. तरीसुद्धा प्रत्येक गोष्ट घडत असताना आपण त्यात आवड उत्पन्न केली तर त्यात कटुता रहात नाही, हेच यावरून बाबांना सांगायचे आहे. श्री साईबाबांच्या शिकवणुकीतून जे जे शिकावयास मिळाले ते खालील "सागर-सरिता" या रूपक काव्यकथेत गुंफविण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. बालसाईभक्तांनो, बाबांची ही शिकवण आपण प्रत्यक्ष आचरणात आणल्यास आपण नक्कीच सुखी होऊ.

ध्येय आपुले ठरवुनि घेई
बाळगी ते ध्यानात।
संथ वाहते पावन गंगा
आपुल्या आनंदात॥१॥

निरोप घेता मायपित्याचा
गहिवरली कंठात।
आठव येता कर्तव्याचा
केली भावनेवर मात॥२॥

हृदयाची मग चाले भाषा
निरूपम स्तब्धपणात
नि:शब्दाने निरोप घेता
अश्रू दाटले नेत्रात॥३॥

आशीर्वाद तो मायपित्याचा
जतन करूनी हृदयात।
प्रेम तयांचे सोबत असता
भय ते कसले त्रैलोक्यात॥४॥

मार्गी कुणी भेटता
पुसे न जात-पात।
आदर्श दावि समतत्त्वाचा
विनम्र अभिवेशात॥५॥

वाटेमधले खाचखळगे भरता
न घेई कुणाची साथ।
उणीव कुणाची खपे न तिजला
जणु प्रेमाची बरसात॥६॥

देण्यासाठी हात तियेचा
न हात पसरी जनात।
शुद्ध मनाचि प्रेमळ सरिता
मग्न सदा ध्येयात॥७॥

सागराचे गान गाता
निसर्ग सौंदर्यात।
भरून येतसे ऊर तियेचा
जणु भक्तीचा वर्षाव॥८॥

काठावरली अनुपम शोभा
भरून ठेवि स्मरणात।
तियेचि ही विचारधारा
वाहे शुद्धपणात॥९॥

गाय असो वा वाघ वनिचा
भेद न मानि मनात।
तहानेल्याची तहान जाणता
तत्पर जल देण्यात॥१०॥

विनम्रतेचि आवड तिजला